रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३०६
www.ramprahar.com
◆ सोमवार, २५ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘नीट’ पेपरफुटीमुळे लातूरमध्ये विद्यार्थिनीची आत्महत्या




**लातूर :** ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणात दिवसेंदिवस धक्कादायक माहिती समोर येत आहे. या प्रकरणाची सुरुवात राजस्थानमधून होऊन त्याचे धागेदोरे राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांत सापडले आहेत. त्यानंतर पेपरफुटीचे लातूर कनेक्शन उघड झाले. ‘नीट’ पेपरफुटीमुळे अनेक विद्यार्थ्यांनी आपलं जीवन संपवलंय. आता ‘नीट’ पेपरफुटीचा आखणी एक बळी गेला आहे. लातूरमध्ये एका विद्यार्थिनीने पेपरफुटीच्या तणावातून गळफास घेत आत्महत्या केली. मैथिली सोनवणे (रा. गोंदेगाव) असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. डॉक्टर बनण्याचे स्वप्न बाळगणारी मैथिली ‘नीट’चा पेपर फुटल्याने मागच्या काही दिवसांपासून तणावात होती आणि याच तणावातून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे नातेवाइकांनी सांगितले. दरम्यान, या घटनेची गातेगाव पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### अंतरंग
कडावच्या प्रस्तावित डम्पिंग ग्राउंडचा प्रस्ताव रद्द/२
अवकाळीचा फटका! कडधान्याचे भाव वधारले/५
रायगडची क्रिकेटर काजल साळुंखेची निवड/८

# विदर्भात उष्णतेची तीव्र लाट
## यवतमाळमध्ये ४८ तासांत आठ जणांचा मृत्यू

**यवतमाळ : प्रतिनिधी**



गेल्या काही दिवसांपासून राज्यात उष्णतेचा कडाका प्रचंड वाढला आहे. त्यातही विदर्भात सूर्याने आग ओकण्यास सुरुवात केली असून तापमानाचा पारा कमालीचा वाढला आहे. यवतमाळ जिल्ह्यात गेल्या ४८ तासांमध्ये आठ जणांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व मृत्यू उष्माघाताचे बळी असल्याचे म्हटले जात आहे.

दिग्रस येथे २४ तासांत तिघांच्या मृत्यूची माहिती पुढे आली होती. यासोबतच यवतमाळच्या चापमनवाडी आणि भोसा मार्गावर दोघांचे, पुसदमध्ये दोन, तर बाभूळगावच्या गवंडी येथे एकाचा आकस्मिक मृत्यू झाला आहे.

मृतांपैकी चार जणांची ओळख पटली आहे, तर चौघे अज्ञात आहेत. बाभूळगावच्या गवंडी ते किन्ही रस्त्यावर पुलाखाली मारोतराव कावे यांचा मृतदेह आढळून आला. पुसदच्या हनुमान वॉर्डात अन्नपूर्णा मुळे या वृद्ध महिलेने भर उन्हात कुलरमध्ये पाणी भरले. त्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागले. रुग्णालयात हलवल्यानंतर उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. पुसदच्याच इंदिरानगर भागातील डम्पिंग यार्डसमोर सुभाष राठोड यांचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली.

विदर्भात उष्णतेची लाट कायम असून शहराप्रमाणे ग्रामीण भागालादेखील या उष्णतेच्या लाटेचा परिणाम जाणवू लागला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात तीव्र उष्ण लाटेची शक्यता असल्याने रेड अलर्ट कायम आहे. यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर जिल्ह्यांतही दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, नागरिकांनी कामाशिवाय बाहेर पडू नये, शेतातील किंवा इतर कष्टाची व अतिश्रमाची कामे दुपारी करणे टाळावे तसेच सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### तेलंगणात उष्माघातामुळे तब्बल ५१ जणांचा बळी

**हैदराबाद :** तेलंगणा राज्यात उष्णतेचा प्रकोप दिवसेंदिवस वाढत असून शनिवारी विविध भागांमध्ये उष्माघातामुळे तब्बल ५१ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये सर्वाधिक २३ मृत्यू वारंगळ जिल्ह्यात झाले. याशिवाय करीमनगर जिल्ह्यात ११, खम्ममध्ये सात, तर आदिलाबादमध्ये आणि नलगोंडा येथे प्रत्येकी पाच जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला. दरम्यान, शुक्रवारीही तीव्र उकाड्यामुळे ३४ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर मृतांच्या कुटुंबीयांना सरकारने प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

## मराठवाड्यात पावसाच्या सरी

**बीड : प्रतिनिधी**

विदर्भात उष्णतेची लाट आली असताना मराठवाड्यात मात्र रविवारी (दि.२४) मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावत अनेक जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढले. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. अनेक ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गेले, तर काही भागांत हरभऱ्याएवढ्या गारांचा वर्षाव झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की अनेक गावांमध्ये झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या. काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांची धावपळ उडाली. कोकणातही सरी पडल्या.

## मुंगेरीलाल के हसीन सपने!
### मुख्यमंत्री फडणवीसांचा राहुल गांधींना टोला

**नागपूर : प्रतिनिधी**



काँग्रेस अल्पसंख्याक सल्लागार समितीच्या बैठकीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुढील वर्षभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार कोसळणार, असा दावा केला. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात पलटवार करताना ‘मुंगेरीलाल के हसीन सपने’ यापेक्षा वेगळे काही नसल्याचा टोला लगावला.

काँग्रेसच्या अल्पसंख्याक सल्लागार समितीची बैठक रविवारी (दि.२४) पार पडली. या बैठकीत राहुल गांधी यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थिती आणि देशातील वाढता असंतोष यामुळे पंतप्रधान मोदींना पदावरून पायउतार व्हावे लागेल, असे वक्तव्य केले. या विधानाचा भाजपकडून समाचार घेतला जात आहे. दोन दिवसांपूर्वीही राहुल यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर अश्लाघ्य भाषेत टीका केली होती.

भाजप नेते तथा केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनीही या प्रकरणावर सोशल मीडियावरून प्रतिक्रिया नोंदवताना राहुल गांधींच्या विधानाला अराजकता निर्माण करण्याचा कट असे म्हटले आहे. हा केवळ राजकीय हल्ला नाही, तर देशाच्या स्थिरतेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती विशेषांकाचे आज प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशसेवेची आणि पंतप्रधानपदाच्या कार्यकाळातील यशस्वी १२ वर्षे पूर्ण केल्यानिमित्त तयार करण्यात आलेल्या राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती या विशेष संग्राह्य अंकाचे सोमवारी (दि. २५) मुंबईत भव्य प्रकाशन होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील गेल्या १२ वर्षांतील देशाचा विकासप्रवास, महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय आणि विविध क्षेत्रांतील कामगिरीचा लेखाजोखा या विशेषांकाच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. हा प्रकाशन सोहळा प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला असून यावेळी भाजपचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## चेरीवली शाळेला संगणक, सीसीटीव्ही आणि वायफाय सुविधा
### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते साहित्य सुपूर्द

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेची पनवेल तालुक्यातील चेरीवली शाळा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दत्तक घेतली आहे. गेल्या सात वर्षांपासून त्यांचा बालमित्र सचिन पाटील यांच्या माध्यमातून शाळेला दरवर्षी भौतिक व शैक्षणिक सुविधांसाठी लाखमोलाची आर्थिक मदत केली जाते. यंदा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शाळेसाठी संगणक, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच वायफाय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शाळेचे मुख्याध्यापक संतोष हेमाडे यांच्याकडे साहित्य सुपूर्द करण्यात आले. वाजे ग्रामपंचायतीचे सरपंच शामकांत भालेकर, माजी सरपंच राजेंद्र भालेकर, सदस्य प्रदीप भालेकर आदी उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेणे अधिक सुलभ होणार आहे.

## पाकिस्तानमध्ये आत्मघातकी स्फोटात २४ सैनिकांचा मृत्यू

**क्वेटा : वृत्तसंस्था**

पाकिस्तानमधील बलुचिस्तान प्रांतात रविवारी (दि. २४) सकाळी भीषण दहशतवादी हल्ला झाला. क्वेटा लष्करी छावणी येथून निघालेल्या एका प्रवासी ट्रेनला लक्ष्य करून करण्यात आलेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात २४ पाकिस्तानी सैनिक ठार झाले असून १००हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत.

क्वेटा लष्करी छावणीतून प्रवाशांना घेऊन निघालेली ही ट्रेन अवघ्या काही अंतरावर असणाऱ्या चमन फाटकाजवळ पोहचली असता एका वाहनाच्या साहाय्याने हा शक्तिशाली आयईडी स्फोट घडवून आणण्यात आला. स्फोटानंतर ट्रेनला भीषण आग लागली. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, बलुच लिबरेशन आर्मी या संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

## निवडक

### कर्नाटकमध्ये नदीत बुडून आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू

**बंगळुरू :** कर्नाटकच्या उत्तर कन्नड जिल्ह्यातील वेंकटपुरा नदीत शिंपले गोळा करत असताना अचानक पाण्याची पातळी वाढल्याने आठ जणांचा बुडून मृत्यू झाला. ही घटना भटकल तालुक्यातील शिराली आणि टट्टी हक्कल परिसरात रविवारी (दि.२४) घडली. मृतांमध्ये सात महिला आणि एका पुरुषाचा समावेश असून एका महिला आणि पुरुषाचा शोध सुरू आहे, तर चार जणांना वाचवण्यात यश आले. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### प. बंगाल सरकार बांगलादेशी, रोहिंग्यांना परत पाठवणार

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार येताच एकामागून एक मोठे निर्णय घेतले जात असल्याचे पाहायला मिळत आहे. आता बेकायदा बांगलादेशी आणि रोहिंग्या नागरिकांना त्यांच्या देशात परत पाठवण्यासाठी सुवेंदू अधिकारी सरकारने पश्चिम बंगालमधील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना लेखी सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यामध्ये प्राथमिक पातळीवर विशेष तात्पुरती निवास केंद्र स्थापन करण्याचे निर्देशही सरकारने दिले आहेत.

## कर्जतमध्ये पिसाळलेल्या कुत्र्याची दहशत
# चिमुकल्यासह सात जण जखमी




**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील महावीर पेठ परिसरात रविवारी (दि.२४) सकाळी पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याने धुमाकूळ घालत सहा वर्षांच्या चिमुकल्यासह सात ते आठ जणांना चावा घेतल्याची घटना घडली. या प्रकारामुळे मुख्य बाजारपेठेत भीती आणि घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सांडशी येथील शिव परेश शिर्के (६) या बालकावर पद्मावती ज्वेलर्ससमोर कुत्र्याने अचानक हल्ला केला. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. सुदैवाने नागरिकांनी तातडीने मदत केल्याने मोठा अनर्थ टळला. जखमी बालकावर कर्जत उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. याच कुत्र्याने दीपक ठाकूर (३०, क्रांतीनगर, भिसेगाव) आणि रंजनलाल गुप्ता (४०, नेरळ) यांनाही चावा घेतला आहे. आणखी काही जणांवरही उपचार सुरू आहेत.

घटनेनंतर कर्जत नगरपरिषद प्रशासनाने तातडीने पथक पाठवून पिसाळलेल्या कुत्र्याचा शोध सुरू केला. दुपारी पथकाने कुत्र्याला ताब्यात घेतले.

दरम्यान, हल्ली भटक्या श्वानांकडून नागरिकांवर हल्ले करण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषकरून पिसाळलेले कुत्रे लहान मुले, महिलांवर हल्ला करीत असल्याने त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.




## देशातील १२ खासदारांना ‘संसदरत्न’
### महाराष्ट्राला सर्वाधिक पाच पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १२ खासदारांसह चार संसदीय स्थायी समित्यांची संसदरत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. संसदीय कामगिरीच्या आधारे यंदा १० लोकसभा सदस्य आणि दोन राज्यसभा सदस्यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक पाच खासदारांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातून भाजपच्या डॉ. मेधा कुलकर्णी, स्मिता वाघ, हेमंत सावरा; शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के यांची संसदरत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. अन्य खासदारांमध्ये जगदंबिका पाल, पी.पी. चौधरी, निशिकांत दुबे, प्रवीण पटेल, विद्युत महतो, लुबाराम चौधरी, नरहरी अमीन यांचा समावेश आहे. संसद सदस्यांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६पर्यंतच्या कामगिरीच्या आधारे ही निवड करण्यात आली आहे.



चार संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये चरणजीत सिंह चन्नी यांच्या अध्यक्षतेखालील कृषी समिती, भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखालील वित्त समिती, सप्तगिरी शंकर उल्का यांच्या अध्यक्षतेखालील ग्रामीण विकास आणि पंचायतीराज समिती तसेच अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालील कोळसा आणि खाण समितीचा समावेश आहे. १६वा संसदरत्न पुरस्कार सोहळा जुलैमध्ये नवी दिल्लीत होणार आहे.

## चार महिलांचा बळी घेणारी वाघीण अखेर जेरबंद

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही वनपरिक्षेत्रात चार महिलांचा बळी घेणाऱ्या टी-२ वाघिणीला अखेर वनविभागाने शनिवारी रात्री जेरबंद करण्यात यश मिळवले. गुंजेवाही जंगल परिसरात पार पडलेल्या या थरारक कारवाईनंतर स्थानिक नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

गुंजेवाही जंगलात २२ मे रोजी तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या १३ महिलांच्या गटावर टी-२ वाघिणीने अचानक हल्ला चढवला होता. या हल्ल्यात चार महिलांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या हल्ल्याची गंभीर दखल घेत वनविभागाने विशेष पथक तयार करून शोधमोहीम सुरू केली. शनिवारी सायंकाळी पथकाने ट्रॅन्क्युलायझर डार्टच्या साहाय्याने या नरभक्षक वाघिणीचा अचूक वेध घेतला आणि रात्री आठच्या सुमारास तिला पूर्णपणे जेरबंद करण्यात आले. दरम्यान, वनविभागाने नागरिकांना जंगल परिसरात सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

# सार्वजनिक आरोग्यसेवेला बळ! शस्त्रक्रियांची अचूकता, सुरक्षितता वाढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि सर्वसामान्यांना दर्जेदार उपचार मिळावेत या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. मुंबईतील सेठ जी. एस. मेडिकल कॉलेज आणि केईएम रुग्णालय येथे अत्याधुनिक 'हाय-एंड व्हेसल सीलर' (Vessel Sealer) उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे शस्त्रक्रियांच्या गुणवत्तेत मोठी सुधारणा होणार आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा मिळणार आहेत. या सीएसआर प्रकल्पांतर्गत दोन प्रगत इलेक्ट्रोसर्जिकल युनिट्स जनरल सर्जरी विभागासाठी 'इलेक्टिव्ह सर्जरी ओटी' जमेशदजी मेहता शस्त्रक्रिया कक्षामध्ये बसविण्यात आले आहेत.

केईएम रुग्णालय हे मुंबईतील सर्वात मोठ्या सार्वजनिक आरोग्य संस्थांपैकी एक असून येथे दररोज हजारो गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. अशा परिस्थितीत अत्याधुनिक उपकरणांची गरज अत्यंत महत्त्वाची होती.

नव्याने बसविण्यात आलेली ही उपकरणे शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्त्राव नियंत्रणासाठी उपयुक्त ठरणार असून रक्तवाहिन्या सील करून रक्तस्राव त्वरित थांबवण्यास मदत करतात. या उपकरणांमुळे शस्त्रक्रियेची अचूकता वाढेल, गुंतागुंत कमी होईल आणि रुग्णांच्या सुरक्षिततेत मोठी वाढ होईल.

विशेषतः जटिल शस्त्रक्रियांमध्ये रक्तस्राव कमी होऊन डॉक्टरांना अधिक कार्यक्षमतेने उपचार करता येणार आहेत. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की, 'राज्यातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आणि अत्याधुनिक आरोग्य सेवा मिळणे ही शासनाची प्राथमिकता आहे.

अशा प्रकल्पांमुळे सार्वजनिक रुग्णालयांची क्षमता वाढून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळतो.' या उपक्रमामुळे केवळ आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचावणार नाही, तर गरीब आणि वंचित घटकांसाठी आधुनिक वैद्यकीय सुविधांचा मार्गही अधिक सुलभ होणार आहे.

# बेणसे सिद्धार्थ नगरातील विजेचे जर्जर पोल कोसळून दुर्घटनेची भीती

**पाली : प्रतिनिधी**

बेणसे येथील सिद्धार्थ नगर परिसरात उभे असलेले विद्युत खांब सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, प्रवेशद्वारा जवळील व समीर अडसुळे यांच्या घराजवळील खांब गंजून पूर्णपणे जर्जर झालेला आहे. या पोलमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या विद्युतखांबांचा तळभाग पूर्णपणे पोखरला गेला असून, काही खांब एका बाजूला झुकलेल्या अवस्थेत दिसत आहेत. त्यामुळे कोणत्याही क्षणी हा पोल कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेक वेळा महावितरण विभागाकडे तक्रारी करूनही अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. "अपघात झाल्यानंतरच प्रशासन खडबडून जागे होणार का?" असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. बेणसे मोहल्ला येथील आशिफ मोमीन यांच्या घराजवळील पोल देखील धोकादायक स्थितीत आहे. त्याकडे ही दुर्लक्ष केले जातं आहे.

सिद्धार्थ नगर परिसरात लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला मोठ्या प्रमाणात वावरत असतात. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गंजलेल्या खांबांची स्थिती अधिकच धोकादायक बनली असून, जोरदार वारा किंवा पावसामुळे पोल कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विजेच्या तारा तुटून विद्युत प्रवाहाचा धोका निर्माण झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.दरम्यान, परिसरातील धोकादायक वीजखांबांचे तात्काळ सर्वेक्षण करून जर्जर पोल बदलण्यात यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# कडाव येथील प्रस्तावित डम्पिंग ग्राउंडचा प्रस्ताव कायमस्वरूपी रद्द

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील माणकिवली गावाच्या रस्त्यालगत प्रस्तावित करण्यात आलेल्या डंपिंग ग्राउंडला ग्रामस्थांनी केलेल्या तीव्र विरोधाला अखेर यश मिळाले असून कडाव ग्रामपंचायतीने सदर प्रस्ताव कायमस्वरूपी रद्द केला आहे. या निर्णयामुळे माणकिवली ग्रामस्थ, आदिवासी बांधव तसेच स्थानिक शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



माणकिवली गावाच्या हद्दीत, आदिवासी वस्तीच्या शेजारी तसेच गावाच्या मुख्य रस्त्यालगत डंपिंग ग्राउंड उभारण्याचा प्रस्ताव कडाव ग्रामपंचायतीकडून पुढे आणण्यात आला होता. दि. २७ जून २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेतील ठरावानुसार सर्व्हे क्रमांक १३७/१७ या जागेवर डंपिंग ग्राउंड उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविला होता.

प्रस्तावित जागेजवळ आदिवासी लोकवस्ती, अंगणवाडी, शाळकरी विद्यार्थ्यांची नियमित वर्दळ तसेच ग्रामदैवत "सातीचे देव" यांचे स्थान असल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. डंपिंग ग्राउंडमुळे परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता, माशा-मच्छरांचा प्रादुर्भाव, दूषित पाण्याचा धोका तसेच नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली होती.

यासंदर्भात माणकिवली ग्रामस्थ, महिला मंडळ, आदिवासी बांधव तसेच स्थानिक शेतकरी यांच्या वतीने कडाव ग्रामपंचायतीला निवेदन देण्यात आले होते. ग्रामस्थांना विश्वासात न घेता हा निर्णय घेण्यात आल्याचा आरोप करत सदर प्रस्ताव तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच प्रस्ताव रद्द न झाल्यास आंदोलन, उपोषण आणि कायदेशीर लढा उभारण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला होता.

ग्रामस्थांचा वाढता विरोध, स्थानिक नागरिकांमधील संताप आणि सामाजिक वातावरण लक्षात घेता अखेर कडाव ग्रामपंचायतीने माणकिवली गावालगत प्रस्तावित करण्यात आलेला डंपिंग ग्राउंड प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक तथा प्रशासक प्रेमसिंग गिरासे यांनी दूरध्वनीवरून ग्रामस्थांना माहिती दिली.

यावेळी त्यांनी संबंधित जागेत भविष्यात कडाव ग्रामपंचायतीमार्फत कोणत्याही प्रकारचे कामकाज करण्यात येणार नसल्याचे स्पष्ट केले. यानंतर ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीने यासंदर्भात अधिकृत लेखी पत्र द्यावे, अशी मागणी केली. त्यावर प्रशासक प्रेमसिंग गिरासे यांनी ग्रामस्थांना तसे लेखी पत्र देण्याचे आश्वासन दिले असल्याचे समजते.

# मुरूड मच्छीमार मार्केटची वाहतूक कोंडी सुटणार कधी?

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने लाखो रुपये संपवून कोळी बांधवाकरिता मच्छी मार्केट बांधले आहे.परंतु काही कोळी महिला विक्रेते मोटारसायकल लावण्याच्या पार्किंग जागेवर मच्छी विक्री करत असतात.त्यामुळे मच्छी खरेदी करणारे मोटार सायकल वाहन चालक बिंधास्त पणे आपली गाडी रस्तालगत गाडी उभी करुन मच्छी खरेदी करण्यासाठी मच्छी मार्केट मध्ये जातात. त्यामुळे या रस्तावर सतत वाहतुक कोंडी होताना दिसत आहे. ही वाहतूक कोंडी कधी सुटणार असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.



मुरूड पर्यटन क्षेत्र असल्याने याच रस्त्यावरून पर्यटक ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी जा-ये करत असतात.त्या बरोबर स्थानिक नागरिक ही या रस्त्यावरून आपले वाहन घेऊन ये-जा करित असतात.त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. आज रविवारी असल्याने पर्यटकांसह स्थानिक नागरिकांनी मच्छी खरेदी साठी गर्दी केल्याने या रस्त्यावर वाहतूक कोंडी अधिक वाढल्याने वाहनचालकांसह पादचारी अक्षरक्ष वैतागले आहेत.ही वाहतूक कोंडी सुटण्याकरिता स्थानिक प्रतिनिधी पुढे येऊन याठिकाणी वनवे करावे जेणेकरून वाहतूक कोंडीला आळा बसेल अशि मागणी पर्यटकांनसह स्थानिक नागरिक करीत आहेत.

# मुंबई-गोवा महामार्गावरील रस्ता बंद केल्याने गारळ गावाचा संपर्क तुटला

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे गारळ गावातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, गावात ये-जा करण्याचा मुख्य मार्गच बंद करण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. अनेक वर्षांपासून विकासाच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांना आता प्रशासनाच्या उदासीनतेचा फटका बसत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास आमरण उपोषणाचा इशारा ग्रामस्थ मंडळ गारळ यांनी दिला आहे.

गारळ गाव हे मुंबई-गोवा महामार्गालगत वसलेले असून, गावात जाण्यासाठी जिल्हा परिषद अंतर्गत असलेला राज्य मार्ग क्रमांक १७ हा मुख्य संपर्क मार्ग आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. सुरुवातीला ठेकेदार व महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना आश्वासन दिले होते की, गावात ये-जा करण्यासाठी पर्यायी व्यवस्था केली जाईल आणि ग्रामस्थांना कोणताही त्रास होणार नाही. या आश्वासनावर विश्वास ठेवून ग्रामस्थांनी कामालाही सहकार्य केले. मात्र, प्रत्यक्षात २० मे २०२६ रोजी ठेकेदार, महामार्ग अधिकारी आणि पोलिस प्रशासनाच्या उपस्थितीत गारळ गावाकडे जाणारा ओलांड रस्ता जेसीबीच्या साहाय्याने खोदून बंद करण्यात आला. त्यामुळे गारळ गावाचा थेट संपर्कच तुटल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

या रस्त्याद्वारे माणगाव-गोरेगाव परिसरातील शेकडो नागरिकांची दररोज ये-जा होत होती. विद्यार्थ्यांचे शिक्षण, रुग्णांची दवाखान्यातील धावपळ, शेतकऱ्यांची वाहतूक, व्यापारी व्यवहार आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन या सर्वांवर या निर्णयाचा गंभीर परिणाम झाला आहे. अचानक रस्ता बंद झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीती, संभ्रम आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, गावासमोरील पेट्रोल पंप आणि हॉटेल परिसरातील रस्ता मात्र खुला ठेवण्यात आला असून, गारळ गावातील नागरिकांसाठीचा रस्ता "अनधिकृत" असल्याचे कारण देत बंद करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, विकासकामांना त्यांचा विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली नागरिकांचे मूलभूत हक्क हिरावले जाऊ नयेत. गावाचा संपर्कच तोडला गेला तर आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, अग्निशमन दल किंवा इतर सेवा गावात कशा पोहोचणार, असा गंभीर प्रश्नही उपस्थित करण्यात येत आहे.



# काव्य लेखन स्पर्धेत कवी अरुण म्हात्रे राज्यात प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नक्षत्रांच देणं काव्य मंच आळेगाव, तालुका जुन्नर विभाग प्रमुख कविवर्य पियुष शाम काळे यांनी "संसार वेल" हा विषय देऊन निःशुल्क राज्यस्तरीय ऑनलाइन काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.राजेंद्र सोनवणे यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने केले.




सदर स्पर्धेत राज्याच्या विविध भागातील एकूण- ४९ कवी/कवयित्रींनी सहभाग नोंदवला.परीक्षकांनी पारदर्शक परीक्षण करून प्रथम, द्वितीय, आणि तृतीय असे तीन क्रमांक काढले. त्यामध्ये जासई, उरण, रायगडचे कविश्री: अरुण द. म्हात्रे. यांना प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तसेच कवी: अशोक भगवान उघडे- जुन्नर, पुणे यांना द्वितीय व कवयित्री: सौ. ज्योती सुधीर देशमुख- दहिसर यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

स्पर्धेचे परीक्षण खान्देश कन्न्या स्वप्ना आकाश बेलदार यांनी पारदर्शक व उत्तम करून मनोगतातून छान मार्गदर्शन केले. आयोजक कवी पियुष काळे यांनी योग्य सूचनांसह उत्तम मार्गदर्शन केले. तिन्ही विजयी स्पर्धकांना सन्मान चिन्ह/सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व सहभाग धारकांना प्रमाणपत्र देण्यात आले. विजयी आणि सहभाग धारक यांचे आयोजकांनी मनापासून अभिनंदन केले.

# लाईव्ह इव्हेंट्सच्या परवानग्यांसाठी आता एक खिडकी व्यवस्था

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील 'लाईव्ह इव्हेंट' क्षेत्राला चालना देण्यासाठी एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सर्व परवानग्या मिळण्याची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी शासनाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे.



लाईव्ह इव्हेंटसंदर्भातील सर्व परवानग्यांसाठी तयार करण्यात येणाऱ्या एसओपी करिता (सर्वसमावेशक विशिष्ट कार्यपद्धती) संबंधित विभागांनी सूचना द्याव्यात आणि सहकार्य करावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

लाइव्ह इव्हेंट क्षेत्राला विकास आणि प्रोत्साहन देण्यासाठी, २४ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठीत राज्यस्तरीय समितीच्या पहिल्या बैठकीत प्रधान सचिव सिंह बोलत होते. मंत्रालयातील परिषद सभागृहात ही बैठक झाली. बैठकीस महाआयटी आयुक्त भुवनेश्वरी बी, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, पोलीस उपायुक्त अकबर पठाण आदी उपस्थित होते.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे यांनी प्रास्ताविकेतून लाईव्ह इव्हेंटसाठी करण्यात येणाऱ्या एसओपीची बैठकीत माहिती दिली.

प्रधान सचिव सिंह म्हणाले, सद्यस्थितीत कोणताही मोठा कार्यक्रम आयोजित करताना आयोजकांना पोलीस, अग्निशमन, वीज, महापालिका, महसूल आदी विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घ्याव्या लागतात. या प्रक्रियेत अधिकचा वेळ लागतो. यामध्ये आता वेळ, प्रक्रिया आणि कागदपत्रांची संख्या कमी करून संपूर्ण प्रक्रियेत एकसूत्रता आणण्यात येणार आहे. परवानग्या 'सिंगल विंडो सिस्टीम' मध्ये देण्याची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र पोर्टलही विकसित करण्यात येणार आहे.

# फळ मार्केटच्या धोकादायक पॅसेजकडे दुर्लक्ष; काही व्यापाऱ्यांकडून स्वखर्चाने डागडुजी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई एपीएमसी फळ मार्केटमधील ६ विंगमधील कॉमन पॅसेजची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून व्यापारी, ग्राहक आणि कामगार जीव मुठीत धरून ये-जा करत आहेत. अनेक ठिकाणी छताचे प्लास्टर कोसळत असल्याने गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाकडून दुरुस्तीला विलंब होत असल्याने काही व्यापाऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने पॅसेजची डागडुजी सुरू केली आहे.

विशेष म्हणजे, या कॉमन पॅसेज दुरुस्तीसाठी तब्बल १ कोटी ६३ लाख रुपयांची मंजुरी मिळून एक वर्ष उलटले, तरी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. ६ विंगच्या दोन्ही बाजूंतील सामायिक पॅसेजच्या छताची दुरुस्ती अद्याप रखडलेली आहे.

व्यापाऱ्यांच्या आरोपानुसार, फळ मार्केटच्या उप अभियंत्यांनी छताच्या वरच्या भागातील वॉटरप्रूफिंगचे काम न करता केवळ खालच्या भागाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव पणन विभागाकडे पाठवला होता. त्याला कार्यकारी अभियंत्यांनीही हिरवा कंदील दिल्याचा आरोप होत आहे. मात्र ही माहिती समोर आल्यानंतर व्यापाऱ्यांनी अभियंता विभागालाच "पहिले वॉटरप्रूफिंग करा, मग खालची दुरुस्ती करा," अशी शाळा शिकवल्याची चर्चा मार्केटमध्ये रंगली आहे.

व्यापाऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहून प्रशासनाने घाईघाईने वरच्या भागाच्या वॉटरप्रूफिंगच्या कामाचा प्रस्ताव मंजूर करून घेतल्याची माहिती आहे, मात्र हे कामही तातडीने सुरू करण्याची मागणी व्यापाऱ्यांकडून होत आहे. प्रशासनाच्या या भोंगळ कारभारामुळे कॉमन पॅसेजवरील प्लास्टर वारंवार कोसळत असून यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू, तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल का केला जात नाही, असा सवाल व्यापाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.



# एक्स्प्रेस वेची कोंडी पनवेलमध्ये घुसली; सायन-पनवेल हायवेवर पाच किमीच्या रांगा

**पनवेल : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडीचा थेट फटका नवी मुंबईतील सायन-पनवेल महामार्गाला बसला आहे. रविवारी (दि. २४) सकाळी ७ वाजल्यापासून कळंबोली सर्कल ते कामोठे आणि तळोजा फाटादरम्यान जड वाहनांच्या ४-५ किमी लांब रांगा लागल्या होत्या.

कळंबोली स्टील मार्केट, रोडपाली सिग्नल, कामोठे उड्डाणपूल, तळोजा एमआयडीसी फाटा या ठिकाणी वाहतूक ठप्प झाली होती. एक सिग्नल पार करायला ४०-५० मिनिटे लागत होती.

पुणे-गोवा महामार्ग, जेएनपीटीकडे जाणारे सर्व कंटेनर व ट्रक मुंबई-पुणे एक्सप्रेस वेची कोंडी टाळण्यासाठी पनवेलमार्गे वळवले गेले. त्यातच सकाळी ९ वाजता कळंबोली सर्कलजवळ दोन ट्रकची धडक झाल्याने वाहतूक आणखी मंदावली. जेएनपीटी बंदरातून बाहेर पडणारे आयात-निर्यातीचे कंटेनर, मार्केटकडे जाणारे भाजीपाला ट्रक आणि तळोजा एमआयडीसीमधील कामगारांच्या बसेस अडकून पडल्या होत्या. कामोठे, खारघर, कळंबोलीकरांना उरण फाटा, पनवेल शहरात जायला दुप्पट वेळ लागत होता. नवी मुंबई वाहतूक शाखेच्या म्हणण्यानुसार जड वाहनांना खारघर व तळोजा येथे तात्पुरते थांबवून टप्प्याटप्प्याने सोडत आहोत. कळंबोली सर्कलवर २५ अतिरिक्त कर्मचारी तैनात केले आहेत. अपघातग्रस्त ट्रक हटवला आहे, पण बॅकलॉगमुळे काही काळ वाहतूक कोंडी राहील.



## पर्स खेचून चोरी करणारा ताब्यात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलेकडील पर्स चोरून पळून जाणार्‍या विधीसंघर्ष बालकाला तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून तळोजा, कामोठे, खारघर पोलीस ठाण्यातील पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी त्याच्याकडून एक लाख ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. १७ एप्रिल रोजी सकाळी सव्वासहाच्या दरम्यान मॉर्निंग वॉक करीत असताना मोटारसायकलवर आलेल्या तीन अनोळखी इसमांनी शशिकला मिश्रा (राहणार तळोजा फेस टू) यांची पर्स खेचून त्यातील मोबाइल आणि इतर मुद्देमाल चोरी करून नेला होता. तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तळोजा, खारघर, कामोठे, सानपाडा, वाशी, मानखुर्द, चेंबूर, गोवंडी, टिळकनगर या ठिकाणचे एकूण १२० सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि आरोपी निष्पन्न करून तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या मदतीने विधीसंघर्ष बालकाला ताब्यात घेऊन २३ मे रोजी कर्जत येथील बालसुधारगृहात ठेवण्यात आले.

## निवडक

### कौटुंबिक वादातून एकाची हत्या

**पनवेल :** कौटुंबिक वादातून काही इसमांनी मिळून एका इसमास जबरी मारहाण केल्याने त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहरातील भारतनगर खाडी परिसरात घडली आहे. पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील भारतनगर खाडी परिसरात परस्पर वैमनस्यातून एका इसमाचा खून झाला असल्याची माहिती मिळाली आहे. सलीम अन्वर शेख असे खून झालेल्या इसमाचे नाव आहे. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांचे पथक त्याचप्रमाणे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहचले. तांत्रिक तपास व परिसरातील गुप्त बातमीदारांद्वारे काही इसमांची माहिती मिळाली असून याप्रकरणी काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गेल्या दीड महिन्यात पनवेल परिसरातील ही चौथी हत्या असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### महिलेला मारहाणप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** महिलेला शिवीगाळ, मारहाण आणि मानसिक त्रास देऊन छळ केल्याप्रकरणी पती, सासू आणि सासरे यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात २२ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी महिलेचे २०१० मध्ये लग्न झाले. त्यावेळी त्यांचे पती, सासू, सासरे हे खारघर, सेक्टर ८ येथे राहत असून त्यांनी महिलेला शिवीगाळ आणि मारहाण केली. तसेच मानसिक त्रास देऊन छळ केला. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### अपघातात दुचाकीस्वार जखमी

**नवीन पनवेल :** भरधाव वेगाने वाहन चालवून स्लीप झाल्याने झालेल्या अपघातात आयुष रेडेलवार (राहणार बाळाघाट, मध्य प्रदेश) हा तरुण जखमी झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २२ मे रोजी करण्यात आली आहे. २२ मे रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास शिवगंगा रिसॉर्टजवळ आयुष हा मोटरसायकल क्रमांक एमएच ०६ बी एल ३७० घेऊन भरधाव वेगाने जात होता. त्यावेळी रस्त्याच्या स्पीडब्रेकरवरून त्याची मोटारसायकल स्लीप झाली आणि तो खाली पडला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. या अपघाताची नोंद पोलिसांत झाली आहे.

### ढगाळ वातावरण, उकाडा मात्र कायम

**पनवेल :** गेल्या दोन दिवसांपासून हवामानात बदल होताना पहावयास मिळत आहे. लवकरच मान्सून दाखल होण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात सध्या वातावरण ढगाळ होताना दिसत आहे. असे असले तरी उकाडा मात्र कायम आहे. त्यामुळे नागरिकांना असह्य होत असून सारेजण पावसाची वाट पहात आहेत.



पनवेल : कोकण मराठी साहित्य परिषदेचे सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त कोमसापचे विश्वस्त प्रा. एल. बी. पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. या वेळी कोमसाप जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी, आदर्श शिक्षक ए.डी. पाटील, कोमसाप नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत मढवी, ॲड. मनोज म्हात्रे, गंधार पाटील, भवेश तांडेल आदी उपस्थित होते.



पनवेल : अखिल भारतीय भटक्या व विमुक्त जाती संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मच्छिंद्र भोसले यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रविवारी पनवेल येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या वेळी त्यांचे अभीष्टचिंतन तसेच शाल, पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. भोसले यांच्यासमवेत सविता बाबर, उद्योजक जगदिश वंजारे आणि सामाजिक कार्यकर्ते दिनेश सुर्वे उपस्थित होते.

## इन्फिनिटी फाउंडेशनच्या समर कॅम्पची सांगता; विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उजाळा

**पनवेल : रामपप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाउंडेशनच्या वतीने आयोजित 'इन्फिनिटी समर कॅम्प २०२६'चा समारोप समारंभ व पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या समर कॅम्पमध्ये झुम्बा, डान्स, ड्रॉइंग, मोनो ॲक्टिंग, योगा, पब्लिक स्पिकिंग आणि ब्लॉक प्रिंटिंग अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कॅम्पमध्ये प्रशिक्षक म्हणून झुम्बा व डान्ससाठी आरती भगत, ड्रॉइंगसाठी केविन डायस, मोनो ॲक्टिंगसाठी अभिनेते आनंद पाटील, योगासाठी योग प्रशिक्षक मुकुंद काळे, पब्लिक स्पिकिंगसाठी प्रिया चौधरी, तर ब्लॉक प्रिंटिंगसाठी प्रेमाश्री गजाकोश यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी नगरसेविका डॉ. अस्मिता घरत, सामाजिक कार्यकर्ते मयूर कदम, इन्फिनिटी फाउंडेशन सल्लागार पूरण सिंग, सल्लागार अक्षया चिते, जॉइंट सेक्रेटरी समृद्धी पोटे आणि रेश्मा कुट्टी उपस्थित होते. यावेळी इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला म्हणाले की, इन्फिनिटी समर कॅम्पच्या माध्यमातून मुलांना शिक्षणासोबतच कला, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासाची महत्त्वपूर्ण संधी मिळावी हा आमचा उद्देश आहे. प्रत्येक मुलामध्ये एक वेगळी क्षमता असते, ती ओळखून तिला योग्य दिशा देणे हेच इन्फिनिटी फाउंडेशनचे ध्येय आहे.

समर कॅम्प हेड कार्तिक शर्मा म्हणाले की, या कॅम्पमध्ये मुलांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. विविध उपक्रमांमधून त्यांनी नवीन कौशल्ये शिकली, स्टेजवर स्वतःला व्यक्त केले आणि आत्मविश्वास वाढवला. पालक, प्रशिक्षक आणि इन्फिनिटी टीमच्या सहकार्यामुळे हा कॅम्प यशस्वी झाला. या उपक्रमाबाबत सहभागी विद्यार्थ्यांची पालक जयश्री धुमाळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, मुलांसाठी अशा उत्कृष्ट उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल धन्यवाद. या कॅम्पमध्ये मुलांनी केवळ विविध उपक्रमांचा आनंदच घेतला नाही, तर व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त ठरणार्‍या अनेक नवीन गोष्टीही शिकल्या.

मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. या वेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता, संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळते, असे मत व्यक्त केले.



## पनवेल-कर्जत लोकल ट्रेन लवकरच



**पनवेल : रामपप्रहर वृत्त**

मध्य रेल्वेवरील पनवेल-कर्जत या नवीन रेल्वेमार्गावर लोकल सेवा जुलै २०२६ च्या अखेरपासून सुरू होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पामुळे रायगड व नवी मुंबईतील हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. २९.६ किलोमीटर लांबीचा हा डबल लाईन मार्ग 'मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट' MUTP-३ अंतर्गत २,७८३ कोटी खर्चून बांधण्यात आला आहे. या मार्गावर पनवेल, मोहोपे, चौक, काराव, वारेले अशी ५ नवीन स्थानके आहेत.

वारेले येथे २.६ किलोमीटर लांबीचा मोठा बोगदाही या मार्गाचा भाग आहे. सध्या कर्जतला जाण्यासाठी पनवेलहून कल्याण-डोंबिवली मार्गे जावे लागते व त्याला दीड तास लागतो. नवीन थेट मार्गामुळे हा प्रवास फक्त ४५ मिनिटांत पूर्ण होईल. त्यामुळे प्रवाशांचा दररोज ३० ते ४० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. तसेच पनवेल-ठाणे-कल्याण लोकलवरील गर्दीचा ताणही कमी होईल.

रेल्वे अधिकार्‍यांनी दिलेल्या माहितीनुसार, ९० टक्के काम पूर्ण झाले असून ट्रॅक, ओव्हरहेड वायर व सिग्नलिंगचे काम अंतिम टप्प्यात आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात ट्रायल रन घेतली जाणार असून रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या पाहणीनंतर जुलै अखेरपर्यंत पहिली लोकल धावेल.

सुरुवातीला दिवसाला १२ फेर्‍या चालवण्याचे नियोजन आहे. पुढे हा मार्ग उरणपर्यंत वाढवून पनवेल-उरण-कर्जत असा 'सबर्बन लूप' तयार केला जाणार आहे. त्यामुळे 'तिसरी मुंबई', नवी मुंबई विमानतळ व जेएनपीटी बंदर थेट कर्जत व बदलापूरशी जोडले जातील.

## पनवेल रेल्वेस्थानकात लिफ्टमध्ये तांत्रिक बिघाड

### चार प्रवासी अर्धा तास अडकले

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्र. १ वरील लिफ्टमध्ये तांत्रिक बिघाड होऊन चार प्रवासी सुमारे अर्धा तास अडकून पडले होते. शनिवारी (दि. २३) दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने व लिफ्टच्या बॅकअप सिस्टमने काम न केल्याने लिफ्ट दोन मजल्यांमध्ये अडकली. लिफ्टमध्ये दोन महिला, एक वृद्ध व एक लहान मुलगा असे चौघे होते. ते कर्जतकडे जाण्यासाठी स्थानकात आले होते.

प्रवाशांनी इमर्जन्सी अलार्म वाजवल्यानंतर पनवेल लोहमार्ग पोलीस जीआरपीचे कर्मचारी पाच मिनिटांत घटनास्थळी पोहचले. लिफ्ट देखभाल करणार्‍या टेक्निशियनच्या मदतीने मॅन्युअली दरवाजा उघडून अर्ध्या तासानंतर सर्वांची सुखरूप सुटका करण्यात आली. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. मध्य रेल्वेने या प्रकरणाची चौकशी सुरू केली असून बॅकअप सिस्टम व इमर्जन्सी फोन तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश दिले आहेत. पनवेल स्थानकातील सर्व लिफ्टचे सेफ्टी ऑडिट केले जाणार आहे. मागील दोन महिन्यांतील ही तिसरी घटना आहे.



## गोवठणे गावात नाटकाची समृद्ध परंपरा - 'पानिपत'कार विश्वास पाटील

**उरण : प्रतिनिधी**

गोवठणे गाव मराठी भाषा, नाटक व परंपरा जपण्यासाठी गेली १०० वर्षे प्रयत्न करीत आहे. शिवछत्रपतींच्या रायगड जिल्ह्यात इतिहास घडत असताना या जिल्ह्यातील गोवठणे गावात ऐतिहासिक नाटकाची परंपरा उभी केली जात असताना या गावाच्या रंगभूमीने शेकडो वर्षांच्या नाट्यकलेची समृद्ध परंपरा जोपासली. ग्रामीण रंगभूमीच्या नाट्य परंपरेचा प्रेरणादायी वारसा जोपासत या रंगभूमीने अनेक दर्जेदार आणि रसिकमान्य नाटके दिली. माझ्या लेखणीतून उतरलेली रणांगण नाट्य कलाकृती या गावामध्ये मोठ्या उत्साहाने उमलत आहे. त्यामुळे या बहाद्दर कलाप्रेमी गावाला मी मानाचा मुजरा करतो, असे भावनिक उद्गार पानिपतकार साहित्यिक तथा जिल्हा परिषदेचे निवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास पाटील यांनी काढले.

उरण तालुक्यातील गोवठणे येथील रंगभूमीत जय हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने शनिवारी (दि. २३) रात्री रणांगण या दोन अंकी नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी पानिपतकार विश्वास पाटील आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलत होते.

याप्रसंगी प्रा. एल.बी. पाटील, साहित्यिक डॉ. राठोड, साहित्यिक उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, नाट्य दिग्दर्शक पांडुरंग पाटील, ज्येष्ठ पत्रकार अजित पाटील, राणी म्हात्रे, सुरज म्हात्रे, रुपेश पाटील, चंद्रशेखर ठाकूर, समाधान म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यापुढे विश्वास पाटील यांनी दिग्दर्शक नटवर्य पांडुरंग पाटील यांनी आपले कसब वापरत अभिनयाच्या जोरावर रणांगण.सारख्या नाटकाचे शिवधनुष्य लिलया पेलले आहे. त्यांच्यासह येथील सर्व कलाकारांनी ग्रामीण रंगभूमीसाठी दिलेले योगदान मोठे आहे.

अनेक ग्रामीण कलाकारांनी अभिनयाच्या जोरावर ग्रामीण रंगभूमी समृद्ध केली आहे, असे सांगून पानिपतचा प्रसंग मोठा होता. दिल्लीच्या रक्षणासाठी शिंदे, होळकर व पेशवे हे पानिपतावर लढले. एक लाख बांगडी या पानिपतच्या मैदानावर चुरडली गेली. अशा या प्रचंड लढाईची कहाणी या नाटकातून साकारली गेली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या नाटकाचे लेखन पानिपतकार विश्वास पाटील यांचे आहे, तर नाटकाच्या दिग्दर्शनाची धुरा नटवर्य पांडुरंग पाटील (विंधणे) यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांना सहदिग्दर्शनाची साथ शैलेंद्र म्हात्रे यांनी केली. नाटकात कृष्णकांत म्हात्रे, निलेश म्हात्रे, नरेंद्र वर्तक, अशोक म्हात्रे, जगन वर्तक, रोहण म्हात्रे, विवेक वर्तक, आतिष वर्तक, प्रेम पाटील, अक्षय पाटील, महेश पाटील, चरण वर्तक, कांचन म्हात्रे, शितल म्हात्रे, सोनम म्हात्रे, प्रियांका पाटील यांच्यासह अन्य कलाकारांनी आपल्या भूमिकांना न्याय दिला.

रंगभूषा उदय तांगडी, वेशभूषा अमृत म्हात्रे, ध्वनी मयूर साऊंड सिस्टिम, नेपथ्य राजा जोशी, सूत्रधार सुरेश म्हात्रे, निर्मिती लक्ष्मीकांत म्हात्रे या सर्वांनी विशेष मेहनत घेत ही नाट्यकलाकृती प्रभावीपणे प्रेक्षकांसमोर उभी केली.



संपादकीय

# संरक्षण क्षेत्र आत्मनिर्भर

शिर्डी ही आजवर श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माची भूमी म्हणून ओळखली जात होती. आता याच भूमीतून देशाच्या संरक्षण सामर्थ्यालाही नवी दिशा मिळताना दिसत आहे. शिर्डीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या अत्याधुनिक संरक्षण उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटनामुळे महाराष्ट्राने 'आत्मनिर्भर भारत'च्या स्वप्नात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ही घटना देशासाठी आशादायी ठरणारी आहे.

**भारत आज जगातील वेगाने प्रगती करणाऱ्या राष्ट्रांपैकी एक म्हणून पुढे येत आहे. आर्थिक, तांत्रिक आणि सामरिक क्षेत्रात देशाने घेतलेली झेप जगाचे लक्ष वेधून घेत आहे. अशा वेळी संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता ही केवळ आर्थिक गरज नसून राष्ट्रीय सुरक्षेची अनिवार्य अट बनली आहे. अनेक दशकांपासून भारत मोठ्या प्रमाणावर परदेशातून शस्त्रास्त्रे आणि संरक्षण साहित्य खरेदी करत होता. त्यामुळे प्रचंड परकीय चलन खर्च होत होते तसेच संकटकाळात परकीय पुरवठ्यावर अवलंबून राहण्याची वेळ येत होती. आता मात्र भारताने या परिस्थितीत बदल घडवण्याचा निर्धार केला आहे. शिर्डीत सुरू झालेला अत्याधुनिक संरक्षण उत्पादन प्रकल्प हा त्या बदलाचा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. या प्रकल्पातून तोफगोळे, रॉकेट प्रणाली, ड्रोन आणि विविध आधुनिक संरक्षण साहित्याची निर्मिती होणार आहे. विशेष म्हणजे ही निर्मिती स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असणार आहे. त्यामुळे 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना प्रत्यक्ष बळ मिळणार आहे. महाराष्ट्राने औद्योगिक विकासात नेहमीच देशात आघाडी घेतली आहे. वाहन उद्योग, आयटी, औषधनिर्मिती, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रांत राज्याने उल्लेखनीय प्रगती साधली. आता संरक्षण उद्योगातही महाराष्ट्र वेगाने पुढे येताना दिसत आहे. नागपूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद यांसारख्या शहरांनंतर शिर्डीचाही या नव्या औद्योगिक नकाशात समावेश होत आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्राच्या विकासालाही मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांमध्ये अभियंते, तंत्रज्ञ, संशोधक आणि कुशल कामगारांची गरज असते. त्यामुळे शिक्षण आणि कौशल्य विकासालाही नवी दिशा मिळेल. ग्रामीण आणि निमशहरी भागातील युवकांना मोठ्या शहरांकडे स्थलांतर करण्याऐवजी आपल्या परिसरातच रोजगार मिळण्याची संधी निर्माण होईल. उद्योगवाढीबरोबरच लघुउद्योग, वाहतूक, सेवा आणि व्यापार क्षेत्रालाही याचा सकारात्मक परिणाम जाणवेल. संरक्षण उत्पादन क्षेत्रात भारताने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्र, तेजस लढाऊ विमान, आकाश संरक्षण प्रणाली, अत्याधुनिक ड्रोन यांसारखी उत्पादने भारताच्या सामर्थ्याचे प्रतीक बनली आहेत. आज अनेक देश भारताकडून संरक्षण साहित्य खरेदी करण्यास उत्सुक आहेत. यामुळे भारत केवळ आयातदार राष्ट्र न राहता संरक्षण निर्यातदार देश म्हणूनही पुढे येत आहे. शिर्डीतील प्रकल्पामुळे या क्षमतेत आणखी भर पडणार आहे. भारताची संरक्षण शक्ती वाढणे म्हणजे केवळ युद्धसज्जता नव्हे. ती देशाच्या आत्मविश्वासाची निशाणी आहे. जगातील बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत प्रत्येक राष्ट्राला स्वतःची सुरक्षा मजबूत करणे आवश्यक झाले आहे. सीमावाद, दहशतवाद, सायबर हल्ले आणि आधुनिक युद्धतंत्र यांसारखी आव्हाने दिवसेंदिवस गुंतागुंतीची होत आहेत. अशा परिस्थितीत स्वदेशी संरक्षण उत्पादन देशाला अधिक सक्षम बनवते. संकटाच्या काळात आवश्यक शस्त्रसामग्रीसाठी परदेशावर अवलंबून राहण्याची गरज आता उरली नाही.**

# अलिबागमधील चौलची चंपावती देवी

रायगड जिल्हातील अलिबागच्या दक्षिणेस १८ किमी असलेल्या चौलमध्ये वाघजाईच्या डोंगरातील सातवाहन काळातील लेणी त्या काळाचे चौलशी नाते दाखवते. चौल जगाच्या नकाशातील एकेकाळचे भरभराटीचे बंदर, इजिप्त, ग्रीस, चीन आणि आखातातील देशांकडे याच बंदरातून व्यापार होत असे. त्या काळी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी उदयास आलेले हे बंदर पोर्तुगीजांचे महत्त्वाचे ठाणे तसेच निजामशाही, आदिलशाही आणि मराठेशाही जवळून पाहणारे नगर होते...! येथे ३६० मंदिरे व तितकेच तलाव असा इतिहास आहे. चंपावती नगर अशी ख्याती असलेले चौलची ऐतिहासिक काळापासून दक्षिण काशी अशी ओळख सांगितली जात असे.

चौलनाका येथून चौल चौकीनजीक चंपावती आळीत भव्य चंपावती देवीचे मंदिर आहे. हे मंदिर सुमारे ४०० वर्षांपूर्वीचे असावे असे सांगितले जाते. या देवीला 'कालिकामाता' या नावानेसुद्धा ओळखतात. या चंपावती देवीवर कोळी समाजाची अपार श्रद्धा आहे. ऐतिहासिक काळात मंदिर परिसरात फक्त सोनचाफ्याची झाडे होती. त्यामुळेच या देवीला 'चंपावती' हे नाव पडले असावे असे जाणकार मंडळी सांगतात. ही चंपावती देवी साहानी कुटुंबाची कुलदैवत आहे. या देवस्थानाचा जीर्णोद्धार १५ जून १८७२ साली झाला असा उल्लेख आंग्रेकालीन अष्टागर या पुस्तकात आढळतो. त्यानंतर साहानी कुटुंबियांचे आद्यपुरुष पुण्यश्लोक परलोकवासी जनार्दन राघोबा वनमाळी (साहानी) यांनी कुलस्वामिनीच्या देवळाची दुरूस्ती करून देवालयास सुस्वरूपात आणले. त्यानंतर





इ.स.१९६७ साली झालेल्या कोयना भूकंपात या देवस्थानाचे थोडेफार नुकसान झाले. कौले उडून गेली, मंदिरातील लाकूडकामाची पडझड झाली. त्यामुळे या मंदिरास जीर्णोद्धाराची परत एकदा गरज भासली. त्या वेळी कै. ब. खंडेराव स. साहानी, आर्किटेक्ट कै. गजानन ज.साहानी व वसंत बाळाराम साहानी (चिटणीस) या सर्वांच्या मार्गदर्शनातून मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी दैनिक फंड योजना अंमलात आणली गेली.

एप्रिल १९७४मध्ये आर्किटेक्ट कै. गजानन साहानी यांनी देवस्थानाच्या दक्षिणेस लागून पुजाऱ्याकरिता असलेली झापाची पडवी मोडून पक्क्या बांधकामाची पडवी स्वखर्चाने केली व जयवंत साहानी यांनी काही वर्षांपूर्वी देवालयातील देवीसमोरचा चोळ स्वखर्चाने मार्बलने आच्छादित केला. साहानी कुटुंबिय दर दोन वर्षांनी साधारणपणे २६ जानेवारी, १ मे किंवा २५ डिसेंबर रोजी श्री चंपावती देवी दर्शन सहलीस येतात. साहानी कुटुंबियांनी सन २००३मध्ये सिमेंट क्राँक्रीटचे मंदिर बांधून भव्य कळसासह जीर्णोद्धार केला. मुख्य गाभाऱ्यात चौथरा आहे. या मंदिरात अश्विन महिन्यात नवरात्र उत्सव, गुढीपाडवा, रामनवमी उत्सव साजरे केले जातात. हल्ली मंदिराची मालकी महानंदा नाईक यांच्याकडे असून त्या पूजा-अर्चा करतात. उत्सवाच्या दिवशी चंपावती मातेस मुखवटा व दागिन्यांनी सजवण्यात येते. या मंदिराच्या गाभाऱ्यात हनुमान, दत्त व गणपतीची मूर्ती आहे.

मंदिरात कोळी, माळी, गुजराती समाजातील कुटुंबीय मोठ्या प्रमाणावर दर्शनाला येतात. साहानी कुटुंबियांनी सन २०१०मध्ये मूर्तीला वज्रलेप केला.

या देवीवर कोळी लोकांची अपार श्रद्धा असून देवीची आख्यायिका सांगितली जाते. एक मच्छीमार गलबत घेऊन मासेमारी करण्यासाठी खोल समुद्रात गेला आणि अचानक वादळी वारा सुरू झाला. उधाणाने मच्छीमार भयभीत झाला. त्याने चंपावती मातेचे स्मरण केले आणि तिला नवस बोलला की, या उधाणातून मी वाचून किनाऱ्यावर माझे गलबत घेऊन लागलो, तर परस्पर घरी न जाता तुला एक हजार रुपये किमतीची सोनचाफ्याची फुले वाहिन. काही तासांतच तो किनाऱ्यावर सुखरूप गलबतासह परत आला. त्या वेळी दुपार झाली होती. त्याने बाजारात फुले खरेदी करण्यासाठी धाव घेतली खरी, पण कुठेच फुले शिल्लक नव्हती. तेथेच एका वृद्ध महिलेकडे सोनचाफ्याच्या फुलांची पाकळी करंडीत होती. ती वृद्ध महिला पाकळी फुकट देत असतानासुद्धा तिला पैसे देऊन विकत घेऊन त्याने मंदिर गाठले. तो चंपावती मातेच्या पाया पडला आणि मला सुखरूप तुझ्याजवळ आणलेस, पण मला फुले मिळाली नाहीत. ही पाकळी तु फुले समजून स्वीकार कर आणि मला क्षमा कर, असे म्हणत त्याने पाकळी चंपावती मातेस वाहिली. त्याच क्षणी चंपावती मातेने मान वाकवून कळा दिला. आजपर्यंत चंपावती मातेची मान तशीच आहे. यामुळे या चौलची चंपावती देवी नवसाला पावणारी चंपावती देवी म्हणून भाविकांची श्रद्धा आहे.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# संगीतकार लक्ष्मीकांत कुडाळकर

३ नोव्हेंबर १९३७ रोजी संगीतकार लक्ष्मीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव लक्ष्मीकांत शांताराम कुडाळकर. मुंबईच्या झोपडपट्टीत एका कुटुंबात त्यांचा जन्म झाला. अशातच कधीतरी ते मेंडोलीन वाजवायला शिकले. अशाच एका कार्यक्रमात लहानपणीच त्यांनी लतादीदींना साथ केली. त्या वेळी या छोट्या मुलाचे वादनातील कौशल्य याने लतादीदी भारावून गेल्या आणि त्यांनी त्यांना मदत करायचे ठरवले.

लतादीदींनी लक्ष्मीकांतजींना सुरील कला केंद्र या लहान मुलांना संगीतशिक्षण देणाऱ्या संस्थेत पाठवले. तिथेच त्यांची भेट प्यारेलालजींशी झाली. वडील प्रसिद्ध ट्रंपेटवादक असले तरी का कोण जाणे, त्यांनी या कलेचा वारसा प्यारेलालजींना दिला नाही. प्यारेलालजी व्हायोलीन वाजवायला शिकले. लक्ष्मीकांत हे अत्यंत मृदूभाषी होते आणि लाघवी



स्वभावासाठी प्रसिद्ध होते.

गरिबीतून वर आले असल्याने शेवटपर्यंत त्यांचे पाय जमिनीवरच होते. संगीत देणे हे त्यांनी व्यवसाय म्हणून स्वीकारले होते आणि शेवटपर्यंत या व्यवसायाशी ते इमानदार राहिले. १९४८च्या जिद्दीपासून १९६३पर्यंत या दोघांनी त्या काळातल्या फक्त ओ. पी. नय्यर आणि शंकर-जयकिशन वगळता सर्व संगीतकारांकडे कधी नुसते वादक तर कधी संयोजक म्हणून काम केले. 'दोस्ती' चित्रपटासाठी एलपींना त्यांचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार जाहीर झाला, ही बातमी द्यायला स्वतः सी. रामचंद्र त्यांच्या घरी गेले होते. आपल्या ड्रेसिंग सेन्ससाठी प्रसिद्ध असलेल्या चितळकरांनी या समारंभाला हजर राहण्यासाठी त्यांच्या आवडत्या टेलरकडून या दोघांसाठी सूट शिवून घेतला होता.

आपल्या जुन्या वादक सहकाऱ्यांना फ्री-लान्सिंगच्या जमान्यातही टिकवून ठेवणे त्यांना बरोबर जमत असे. लाला पाठारी आणि अब्दुल करीम हे दोघे ढोलकपटू म्हणजे एलपींच्या संगीताचा ट्रेडमार्क. या इंडस्ट्रीत आपल्या ३५ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ६३५ चित्रपटांना, ३५००हून अधिक गाण्यांना त्यांनी संगीत दिले आणि सात फिल्मफेअर पुरस्कार मिळवले. लक्ष्मीकांत यांचे २५ मे १९९८ रोजी निधन झाले.

**-संजीव वेलणकर**



## बदलते तंत्रज्ञान

# जाणून घ्या कोणते स्क्रीन गार्ड ठरेल तुमच्यासाठी बेस्ट

मोबाईल फोनमधील स्क्रीन फ्रेमबाबत अनेकांना प्रश्न निर्माण होत असतात. लोकांचा असा विश्वास असतो की, स्क्रीन प्रोटेक्टरशिवाय टच अधिक चांगले काम करते. याशिवाय बऱ्याच लोकांचा असा विश्वास आहे की, ते स्क्रॅच आणि नुकसानापासून डिव्हाइसचे प्रोटेक्शन करतात. यातही कंपनीचे ऑथोराइझ प्रोटेक्टर बसवायचे की लोकल मार्केटमधून ते खरेदी करायचे अशी दुविधा निर्माण होते. आज आम्ही तुमच्या अशाच काही प्रश्नांची उत्तरे देणार आहोत.



आजकाल काही स्मार्टफोन्स बॉक्समध्ये स्क्रीन प्रोटेक्टरसह येतात. बहुतेक स्मार्टफोन्सवर टीपीयू (थिन-फिल्म थर्मोप्लास्टिक पॉलीयुरेथेन) स्क्रीनगार्ड लावलेले असते. हे स्क्रॅचपासून स्क्रीनचे प्रोटेक्शन करू शकतात, परंतु पडल्यामुळे होणाऱ्या नुकसान होण्यापासून प्रोटेक्शन करू शकत नाहीत. जर डिव्हाईस जास्त काळासाठी वापरायचे असेल तर त्याचा वापर करू नये.

लोकांच्या हातातून स्मार्टफोन निसटणे आणि खाली पडणे खूप सामान्य झाले आहे, टीपीयूऐवजी टेम्पर्ड स्क्रीन गार्डसारख्या इतर ऑप्शन्सचा ते विचार करू शकतात. हे प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या डिस्प्लेला नुकसान होण्यापासून वाचवते.

**स्क्रीन गार्डचे नेमके किती प्रकार असतात?**


आजकाल लोकल मार्केटमध्ये उपलब्ध असलेल्या स्क्रिन गार्ड्सबद्दल ग्राहकांमध्ये गोंधळ उडतो. बाजारात ७डी ते ११डी पर्यंत अनेक स्क्रिन गार्ड्स उपलब्ध आहेत. स्क्रीन गार्डचे बाजारात किती प्रकार उपलब्ध आहेत ते जाणून घेऊया.

स्मार्टफोनचा डिस्प्ले सुरक्षित ठेवणे खूप महत्त्वाचे आहे आणि जर तुम्ही काही वर्षांनी तो फोन विकण्याचा विचार करत असाल तर जुना डिस्प्ले असलेल्या फोनची किंमत स्क्रॅच किंवा तुटलेली डिस्प्ले असलेल्या फोनपेक्षा नक्कीच जास्त असते.

**कर्व्ड डिस्प्ले असलेल्या फोनसाठी स्क्रीन प्रोटेक्टर**

जर तुमच्याकडे कर्व्ड डिस्प्ले असलेला फोन असेल तर टीपीयू किंवा पीईटी फिल्म पुरेशी असेल, पण त्यामुळे फोनच्या बॉडीला होणारे नुकसान टाळता येत नाही कर्व्ड डिस्प्ले असलेले फोनसाठी यूव्ही स्क्रीन प्रोटेक्टर किंवा लिक्विड स्क्रीन प्रोटेक्टर मोठ्या प्रमाणात खरेदी केले जातात. परंतु कर्व्ड स्क्रीनवर ते इन्स्टॉल करणे थोडे कठीण आहे. त्याचवेळी वनप्लस आणि शाओमीसारख्या काही कंपन्या युजर्सना यूव्ही स्क्रीन गार्ड वापरण्यास मनाई करतात. आम्ही त्यांचा वापर न करण्याचा सल्ला देतो कारण यामुळे डिस्प्लेला कायमचे नुकसान होऊ शकते.

# इतिहासकार, लेखक त्र्यंबक शेजवलकर



निमित्त

मराठ्यांच्या इतिहासाचे भाष्यकार, संशोधक व इतिहासकार अशी त्र्यंबक शंकर शेजवलकर यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म २५ मे १८९५ रोजी राजापूर तालुक्यातील (जि. रत्नागिरी) कशेळी येथे झाला. मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतून मॅट्रिक व विल्सन महाविद्यालयातून बीए झाले. पुढे मुंबईतच लष्कराच्या लेखा विभागात नोकरी धरली. हे खाते पुण्यास वानवडी येथे हलविण्यात आल्याने शेजवलकर पुण्यास आले, मात्र २० जून १९२१पर्यंतच या नोकरीत राहिले.

पुण्यात असताना त्र्यंबक शेजवलकर भारत इतिहास संशोधक मंडळाचे सभासद झाले. साहजिकच त्यांचा दत्तो वामन पोतदार, दत्तोपंत आपटे, गो.स. सरदेसाई प्रभृतींशी परिचय झाला. या वास्तव्यात गो.स. सरदेसाई यांनी त्यांना बडोद्यास आपल्या सहकार्यास येण्याचे आवाहन केले व त्यानुसार ते बडोद्यास गेले. तथापि त्यांना प्रबंधाद्वारे एम.ए. ही पदवी घ्यावयाची होती, म्हणून ते मुंबईस आले.

बडोद्याच्या वास्तव्यात शेजवलकरांच्या गुणवत्तेमुळे रियासतकार सरदेसाई प्रभावित झाले होते. त्यामुळे जेव्हा त्यांनी नानासाहेब पेशवे हे पुस्तक लिहिले, तेव्हा शेजवलकरांना त्यास प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली. त्यांनी भिन्न मतप्रदर्शक व विचारप्रवर्तक अशी दीर्घ प्रस्तावना लिहिली. तेव्हापासून एक साक्षेपी इतिहासकार म्हणून शेजवलकरांचा नावलौकिक झाला.

कर्नाटक छापखान्याने (मुंबई) काढलेल्या प्रगति या साप्ताहिकाचे संपादन त्यांनी केले आणि त्याद्वारे अनेक विचारप्रवर्तक लेख लिहिले, पण ब्रिटिश शासनाच्या रोषामुळे ते साप्ताहिक बंद पडले. त्यानंतरचा त्यांचा पाच-सहा वर्षांचा काळ हलाखीत गेला. पुढे मराठ्यांच्या इतिहासाचे प्रपाठक म्हणून त्यांची डेक्कन कॉलेज (पुणे) येथे नियुक्ती झाली. तिथून ते १९५५मध्ये निवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतरही गुणश्री प्राध्यापक म्हणून ते डेक्कन कॉलेजात काम करीत. शेजवलकरांचे एक मित्र ह.वि. मोटे यांनी प्रगति साप्ताहिकात व इतरत्र प्रसिद्ध झालेले काही स्फुटलेख शेजवलकरांचे लेख-प्रथम खंड व शेजवलकरांचे लेख : खंड दुसरा प्रकाशित केले. शेजवलकरांनी इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांत पुढील मोजकीच पुस्तके लिहिली. याशिवाय काही ऐतिहासिक मूळ पत्रे संपादून नागपूर अफेअर्स भाग १ व २ या शीर्षकाने प्रसिद्ध केली.

मुंबईच्या मराठा मंदिर या संस्थेने त्यांच्याकडे शिवचरित्र लिहिण्याचे काम सोपविले होते. अखेरपर्यंत ते या कामात व्यग्र होते, परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचे शिवचरित्र पूर्ण होऊ शकले नाही. त्यांच्या मृत्यूनंतर या संस्थेने त्यांनी लिहून ठेवलेली संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना (काही भाग), लेख, टिपणे, चरित्राचा आराखडा, ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे, कौटुंबिक माहिती इ. साहित्य श्री शिवछत्रपति : संकल्पित शिव-चरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने या शीर्षकाखाली प्रसिद्ध केले. या गंथावरून शेजवलकरांचा प्रदीर्घ व्यासंग, स्वतंत्र प्रज्ञा आणि निर्भीड ऐतिहासिक दृष्टिकोन यांचे प्रत्यंतर येते. हे अपूर्ण शिवचरित्र पुढील पिढीस अत्यंत विश्वसनीय असा संदर्भग्रंथ ठरले आहे. या गंथासाठी शेजवलकरांना साहित्य अकादमी पुरस्काराचा (मरणोत्तर) बहुमान मिळाला.

ग्रंथलेखनाबरोबरच त्यांनी वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, गौरवगंथ आदींमधून लेखन केले, तसेच भारत इतिहास संशोधक मंडळातही शोधनिबंध वाचले. यापैकी काही लेख, त्र्यंबक शंकर शेजवलकर : निवडक लेखसंग्रह या नावाने ह.वि. मोटे यांनी प्रसिद्ध केले आहेत. त्यांनी केलेली काही ग्रंथपरीक्षणे त्यांच्या मर्मभेदक व स्वतंत्र समीक्षादृष्टीची निदर्शक आहेत. त्यांचे पानिपत व शिवचरित्र साधने हे दोन ग्रंथ विशेष मान्यता पावले. ते निव्वळ संकलक-संशोधक नव्हते, तर इतिहासाचे प्रतिभावंत भाष्यकार आणि समाजचिंतक होते. ते अविवाहित होते. पुणे येथे त्यांचे २८ नोव्हेंबर १९६३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सावधान! जास्त मीठ ठरेल सायलेंट किलर

अलिकडच्या काळात उच्च रक्तदाब ही समस्या सामान्य होत आहे, मात्र ही एक अतिशय गंभीर समस्या आहे ज्यामुळे हृदयविकाराचा झटका, मेंदूचा झटका आणि मूत्रपिंड निकामी होणे यांसारख्या गंभीर वैद्यकीय परिस्थिती उद्भवू शकतात. वाढते वय, लठ्ठपणा, शारीरिकदृष्ट्या सक्रिय नसणे, दारू-सिगारेटचे व्यसन, अनुवंशिकता ही उच्च रक्तदाबाची प्रमुख कारणे आहेत.



याशिवाय जास्त मीठ खाल्ल्यानेही उच्च रक्तदाब होऊ शकतो. तुम्ही तुमच्या घरातील वडिलधाऱ्यांनाही जास्त मीठ न खाण्याचा सल्ला देताना ऐकले असेल, पण असे का हा प्रश्न जर तुम्हाला पडला आसेल तर हा लेख तुमच्यासाठीच आहे. रोजच्या जीवनात किती मीठ खाणं योग्य राहिल ही गोष्ट जाणून घेऊयात.

आजकाल प्रत्येक दुसरा व्यक्ती तणावाशी झुंजत आहे. काही लोकांना छोट्या-छोट्या गोष्टींवरून ताण घेण्याची सवय असते, पण तुमची ही सवय तुम्हाला उच्च रक्तदाबाचा रुग्ण बनवू शकते. त्यामुळे थंड राहण्याचा प्रयत्न करा.

तणावामुळे राग वाढतो आणि रक्तदाब अचानक वाढतो. तणावातून मुक्त होण्यासाठी बहुतांश तरुणांनी धूम्रपान आणि मद्यपान सुरू केले आहे. काही क्षणांच्या आनंदासाठी तुम्ही तुमचा जीव धोक्यात घालत आहात. त्यामुळे धूम्रपान, तंबाखू आणि मद्यपान सोडा. त्यामुळे उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

डब्ल्यूएचओच्या मते, सामान्य प्रौढ व्यक्तीने एका दिवसात पाच ग्रॅमपेक्षा जास्त मीठ खाऊ नये. जर एखाद्या व्यक्तीने यापेक्षा जास्त मीठ खाल्ले तर ते त्याच्या शरीराला हानी पोहचवते. इतकेच नाही तर अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या म्हणण्यानुसार ज्या लोकांना आधीच उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांनी एका दिवसात १.५ ग्रॅमपेक्षा जास्त मीठ खाऊ नये.

मीठ संतुलित प्रमाणात खा. आपल्या जेवणात फळे इत्यादींमध्ये मीठ घालण्याची सवय सोडून द्या. नियमितपणे व्यायाम करा, जेणेकरून वजन वाढत नाही आणि तुमचे शरीर तंदुरुस्त राहते. मन शांत आणि तणावमुक्त राहण्यासाठी योग आणि ध्यान करा. तणाव हे उच्च रक्तदाबाचे कारण मानले जाते. घरात उच्च रक्तदाबाचा कौटुंबिक इतिहास असल्यास ४० वर्षांनंतर नियमितपणे स्वतःची तपासणी करा. जर उच्च रक्तदाबासाठी कोणतेही औषध घेत असाल तर ते नियमित व वेळेवर घ्या. जड, स्निग्ध पदार्थ, जंक फूड, फास्ट फूड, प्रक्रिया केलेले मांस, पॅकेज केलेले पदार्थ इत्यादी खाणे टाळा. आहारात फळे, हिरव्या भाज्या, कोशिंबीर, रस इत्यादी आरोग्यदायी गोष्टींचा समावेश करा.

# महाड आगाराला आर्थिक फटका; १३ लाखांचे उत्पन्न ११ लाखांवर



अपुरा कर्मचारीवर्ग, प्रवाशांच्या अभावाने होतोय तोटा

**महाड : रामप्रहर वृत्त**

कोकणाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखला जाणाऱ्या महाड एसटी आगारातील कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबरोबरच प्रवासी वर्गाने देखील गेल्या काही महिन्यात मंडळाच्या सेवेकडे पाठ फिरवल्याने प्रतिदिनी १३ लक्ष रुपये असलेले उत्पन्न ११ लक्ष रुपये पर्यंत खाली आल्याची माहिती महाड आगारातील सूत्रांकडून देण्यात आली आहे.

या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीनुसार महाड एसटी आगारात मागील वर्षी चालक वाहकांच्या संख्येत भरती करण्यात आली असली तरीही कार्यशाळा व लिपिक पदांच्या सुमारे ६० पेक्षा जागा रिक्त असल्याचे सांगण्यात आले आहे.कार्यशाळेतील कामगारांची संख्या कमी झाल्याने येथील दुरुस्तीच्या कामावर देखील प्रभाव पडल्याचे निदर्शनास आले असून यामुळे गाड्यांच्या दुरुस्तीमध्ये विलंब होत असल्याचे सांगण्यात येते.

मागील पाच ते सहा वर्षांपासून नवीन एसटी आगाराच्या इमारतीचे काम देखील निधी अभावी रखडले होते मात्र मागील काही महिन्यात त्या ठिकाणी पुन्हा कामाला सुरुवात झाल्याचे प्रत्यक्ष भेटी अंतिम निर्दर्शनास आले आहे मात्र या आगाराचे काम पूर्ण होऊन ते हस्तांतरित होण्यास अजून किमान सहा ते सात महिन्यांचा कालावधी लागेल अशी माहिती प्राप्त झाली आहे.

पुढील महिन्यापासून सुरू होणाऱ्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या असलेल्या आगारातील चालक -वाहकांच्या विश्रांतीगृहाची इमारत ही नादुरुस्त स्थितीत असल्याने नवीन इमारतीमध्ये त्यांना तातडीने राहण्याकरिता व्यवस्था करावी, अशी मागणी चालक वाहक वर्गातून करण्यात येत आहे.

महाड एसटी आगारातील उपाहारगृह मागील दहा वर्षापासून बंद असल्याने येथे रात्री येणाऱ्या प्रवासी वर्गाला तसेच चालक वाहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.एकूणच प्रवाशांच्या सेवेसाठी म्हणून कार्यरत असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ कार्यालयाकडून कोकणातील मुख्य आगार म्हणून परिचित असलेल्या महाड आगारा कडील या बहुविध समस्यांकडे होत असलेल्या दुर्लक्षाबद्दल प्रवाशांनी नाराजी व्यक्त करुन मंत्री भरत गोगावले यांनी लक्ष द्यावे अशी मागणी करीत आहेत.

# सुट्टीत तरुणांनी केली वानस्ते नदी स्वच्छ

**तळा : प्रतिनिधी**



तळा तालुक्यातील वानस्ते(संगम) गावातील तरुणवर्ग उन्हाळी सुट्टीत गावाकडे आले की पर्यावरण रक्षण करणे हा उद्देश ठेवून स्वच्छता अभियान राबविले जाते. या वर्षी २३ मे रोजी दिवसभर नदीतील कचरा काढून नदी स्वच्छ केली आहे.या तरूण वर्गाचा आदर्श घ्यावा असे येथिल तरूणाई मागीलवर्षा पासून काम करताना पहावयास मिळत आहे.

२२ मे रोजी वानस्ते नवतरुण मंडळ यांच्या माध्यमातून नदी स्वच्छते साठी जनजागृती करण्यासाठी एक रिल पोस्ट करण्यात आली होती. ही रील बघून तळा तालुक्यातील तरुणांनी खूप चांगला प्रतिसाद दिला .नदी मध्ये नागरिकाने कचरा टाकू नये हा या मागचा प्रमुख उद्देश होता कारण नदी मधे नागरिकांतून मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो आणि यामुळे नदी दिवसेंदिवस दूषित होत आहे हे निदर्शनात आले नंतर तरुणांनी पुढाकार घेऊन स्वच्छता मोहीम २३ में या दिवशी राबवली आणि नदीपात्रातून एक ट्रॉली भर कचरा काढला आणि या पुढे नागरिकांनी नदी मधे कोणत्या ही प्रकारचा कचरा टाकू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

यामध्ये प्रामुख्याने वानस्ते नवतरुण मंडळ याच बरोबर बेलघर नवतरुण मंडळ, दामेश आणि हॉस्टेल बॉईज, आणि काही गावाकडे आलेले पाहुणे जसे की गुजरात वरून आलेले पाहुणे या सगळ्यांनी सहभाग घेऊन नदीपात्र स्वच्छ केले आहे.

याचा आर्दश घेऊन गावागावांतील तरूण वर्गाने पुढाकार घेऊन आपल्या गावची,परिसराची,तलाव,नदी यांची स्वच्छता राखावी, असा संदेश दिला आहे.

# कै.गोवर्धन तन्ना यांना पुण्यतिथीनिमित्त आदरांजली



**खोपोली : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हाध्यक्ष तथा खोपोलीचे प्रथम शासन नियुक्त नगराध्यक्ष कै. गोवर्धन तन्ना यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी लोहाणा समाज हॉल येथे तसेच स्व. आशा भोसले यांना संगीतमय श्रद्धांजली कार्यक्रम संपन्न झाला लव्हेज गावातील संजय शिवराम पाटील हे या कार्यक्रमाचे आयोजक होते व त्यांनी या कार्यक्रमात आर डी बर्मन यांच्या आवाजात गायलेल्या गाण्याने उपस्थित श्रोत्यांनी भरभरून दाद दिली, सोबत त्यांच्या सौभाग्यवती व इतर कलाकारांनी सादर केलेल्या अनेक गाजलेल्या गाण्यामुळे शनिवारची खोपोली करांची सायंकाळ संगीतमय होऊन गेली, तना परिवाराच्या वतीनेखोपोली शहरातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांना यानिमित्ताने स्मृति चिन्ह देऊन. गौरविण्यात आले ज्येष्ठ नेत्या ॲड मीनाताई बाम यांनी स्वर्गीय तन्ना त्यांच्या काही हृद्य आठवणींना उजाळा दिला

तन्ना परिवाराच्या वतीने व लोहाना समाज व व्यापारी असोसिएशन यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बाजारपेठ रस्त्याला तन्ना यांचे नाव देण्याची घोषणा करण्यात आली. आचारसंहिता संपल्यानंतर विधिवत नामपलकाचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



**खोपोली : गोवंश तस्करी, अवैध प्राणी वाहतूक, सार्वजनिक ठिकाणावर होणारी अवैध कत्तल, प्राणी छळ या विरोधात कायद्याची कठोर अंमलबजावणी व्हावी व धार्मिक क्षणाच्या नावाने होणारी कायद्याची पायमल्ली रोखण्यात यावी यासाठी विश्व हिंदू परिषद, गोरक्षा समितीतर्फे खोपोली पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. गोरक्षा समितीचे ॲड. रोहित कुलकर्णी, ॲड. रवी राणावत यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे यांना निवेदन देऊन कार्यवाहीची विनंती केली.**

# अवकाळीचा फटका! ऐन हंगामात कडधान्याचे भाव वधारले, क्षेत्रही घटले



**पाली : प्रतिनिधी**

अवकाळी पावसाचा फटका व घटते क्षेत्र यामुळे कडधान्ये उत्पादनात घट झाली असल्याने जिल्ह्यात कडधान्याचे भाव वधारले आहेत. मागील वर्षी १५० रुपये किलो मिळणारे स्थानिक गावठी वाल सध्या २५० ते ३०० रुपये किलोने मिळत आहेत. मटकीदेखील प्रचंड वधारली आहे.

रायगड जिल्ह्यात कडधान्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे जवळपास साडेतीन ते चार हजार हेक्टरवर वालाची लागवड केली जाते. त्यानंतर मुग, मटकी, चवळी, तूर आदी कडधान्याची लागवड केली जाते. ग्राहकांची गोडे व कडवे वाल, लहान चवळी आणि गावठी व निडीच्या वालांना अधिक पसंती आहे. पावसाळ्यासाठी खेड्या-पाड्यासह शहरातील अनेक जण या कडधान्याची खरेदी करतात. त्यात गावठी कडधान्यांना अधिक पसंती आणि मागणी असते.

बाजारात किरकोळ आणि घाऊक दरात कडधान्य उपलब्ध आहेत, मात्र यंदा लांबलेला पाऊस तसेच अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात कडधान्य पिकांचे खूप नुकसान झाले. परिणामी वालासह इतरही कडधान्य पिकाचे उत्पादन कमी झाल्याने भाव वधारले आहेत. याशिवाय नारू रोगाचा परिणाम देखील उत्पादन घटण्यावर झाला आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांनी कडधान्य शेतीकडे पाठ फिरवली असल्याने कडधान्य शेतीचे क्षेत्र देखील घटले आहे.

या सर्वांचे एकूणच परिणाम कडधान्य किमती वाढीवर झाला आहे. तसेच अनेकांनी होळी नंतर लगेच कडधान्य खरेदी केली आहे त्यामुळे सध्या बाजारात कडधान्य उपलब्ध होत नाही.

दरवर्षी पावसाळ्याच्या आधी गावठी कडधान्य विकत घेतो. शहरातील नातेवाईकांना आवर्जून भेट म्हणून कडधान्ये पाठवितो. मात्र यंदा भाव खूपच जास्त आहेत. शिवाय गावठी कडधान्याचा तुटवडा आहे. असे गृहिणी प्रियांका गोसावी यांनी सांगितले.

सध्या बाजारात ग्राहकांची कडधान्य खरेदीसाठी लगबग सुरु आहे. गावठी कडधान्यांना अधिक मागणी असते.

अवकाळी पावसामुळे उत्पादन घटल्याने यावर्षी कडधान्यांचे भाव वाढले आहेत. याशिवाय नारू रोगाचा प्रतिकूल परिणाम देखील झाला आहे. शेतकऱ्यांकडे आता मालच शिल्लक राहिला नसल्याने मागणी असूनही पुरवठा करणे अवघड जात असल्याचे कडधान्य विक्रेते भद्रेश शहा यांनी याबाबत माहिती देताना सांगितले.



**खोपोली : खालापूर शहरात रविवारी तासभर कोसळलेल्या मुसळधार पावसाने वातावरण आल्हाददायक झाले. घामाच्या धारांनी हैराण झालेल्या खालापूरकरांना पावसांच्या धारांनी ओलेचिंब केले. खालापूरात नव्याने स्थापन झालेल्या मठालाही वरुणराजाने अभिषेक घातला.**

# दक्ष प्रकल्पासाठी दक्षिण कोरियाच्या सहकार्यातून दोन दिवसीय कार्यशाळा -अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा म्हणाल्या की, महाराष्ट्रातील कौशल्य विकास परिसंस्थेला जागतिक दर्जावर नेण्याच्या दृष्टीने 'दक्ष' उपक्रम आणि 'कोरिया-वर्ल्ड बँक पार्टनरशिप फॅसिलिटी' (KWPF) अंतर्गत मिळालेले जागतिक बँकेचे सहकार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

या अनुदानाच्या माध्यमातून तंत्रशिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण (TVET) क्षेत्रात कौशल्य दरीचे मूल्यांकन (Skill gap assessment), आयटीआय विद्यार्थ्यांचा मागोवा अभ्यास (Tracer study) आणि मॉडेल आयटीआयची संकल्पना यांसारखे दूरगामी सुधारणांचे प्रकल्प यशस्वीपणे राबवले जात आहेत. दि 21-22 मे 2026 रोजी मुंबईत आयोजित ही कार्यशाळा भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि दक्षिण कोरियाच्या अग्रगण्य कौशल्य संस्थांच्या तज्ज्ञांना एकाच व्यासपीठावर आणत आहे.

कोरियाच्या 'Korea Polytechnics','KRIVET' सारख्या जागतिक संस्थांचा अनुभव आणि भारतीय उद्योग क्षेत्रातील धुरिणांचे मार्गदर्शन यांच्या संवादातून आपल्या संस्थात्मक क्षमता अधिक बळकट होतील. 'विकसित भारत 2047' आणि 'विकसित महाराष्ट्र 2047' चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी TVET) यंत्रणेचे सक्षमीकरण हाच मुख्य पाया ठरेल, असा मला विश्वास आहे."


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. १३/२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ०६/०५/२०२६ रोजी दैनिक नवराष्ट्र, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक ग्लोबल टाईम्स, मुंबई, दैनिक सागर, रत्नागिरी, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... धरणाच्या स्लॅबच्या वरच्या पृष्ठभागावर ३६ मिमी जाडीचे मॅस्टिक डांबर टाकणे. | ₹ २४,५०,५२५.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०१/०६/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक १. **रजनी रोहिदास पाटील** २. **सुनिता अशोक घरत** ३. **सविता रोहिदास पाटील** ४. **सुभद्रा रोहिदास पाटील** ५. **स्नेहलता रामनाथ पाटील** ६. **नितीन रामनाथ पाटील** ७. **रेश्मा विशाल पाटील** ८. **स्वप्नाली हरेश कणेकर** ९. **शिल्पा राजेश ठाकुर** १०. **केतन प्रभाकर पाटील** ११. **पुजा प्रशांत कडु** १२. **चंदना वसंत पाटील** १३. **निहाल वसंत पाटील** १४. **हौसा राघो पाटील** १५. **निर्मला काशिनाथ पाटील** १६. **दत्ता बबन पाटील** १७. **दत्ता बबन पाटील** १८. **निर्मळा काशिनाथ पाटील** १९. **यशोदा धर्मा पाटील** २०. **दशरथ राघो पाटील** २१. **गोपीनाथ राघो पाटील** २२. **बारकूबाई राघो पाटील** २३. **सुगंधा गणेश पाटील** २४. **सुभद्रा रोहिदास पाटील** २५ **राजेश रोहिदास पाटील** २६. **अश्विनी रोहिदास पाटील** २७. **सिध्देश रोहिदास पाटील** यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकती असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे जांभुळपाडा, तालुका उरण, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पध्दती भोगवटदार वर्ग | क्षेत्रफळ | | आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | हेक्टर | आर | रू. | पै. |
| २९/२ | १ | ०-४३-५४ | | १० | ४४ |
| | पोटखराबा | ०-१९-६० | | | |
| | **एकुण** | **०-९४-७०** | | **१०** | **४४** |
| एकुण मिळकतीपैकी ६३.१४ मिळकतीचा व्यवहार | | | | | |

प्राप्त परिस्थितीत वरील नमूद केलेल्या जमिन मिळकतींमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार - मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एमओयु वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून **3** दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी .

**सही/-**
**ॲड. सुशांत प्र. घरत**
**बी. कॉम. एल. एल. बी.**

पत्ता :- शॉप नं. ७०३, ७०४, ७०५, सातवा मजला, मुनोत वास्तु ईस्कोटिका, पीएल- १६/३, द कॉर्पोरेट बिजनेस सेंटर, प्रांत ऑफीस समोर, अश्विनी हॉस्पिटल जवळ, ओल्ड ठाणा नाका रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. संपर्क : ९५९४९९३१४१

# मनपाच्या माहिती फलकावर काँग्रेसचे अतिक्रमण

## बेकायदा जाहिरातीद्वारे अभिवादन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ येथील सार्वजनिक रस्त्यावर मोक्याच्या ठिकाणी नवी मुंबई महापालिकेच्या असलेल्या माहिती फलकावर चक्क नवी मुंबई जिल्हा काँग्रेस कमिटीने अतिक्रमण केले आहे. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांना पुण्यस्मरण प्रणाम केले आहे. देशाचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे २०२६ रोजी पुण्यतिथी होती. यानिमित्ताने नवी मुंबई काँग्रेस कमिटीने स्व. राजीव गांधी यांना जाहिरातीच्या माध्यमातून कोटी कोटी प्रणाम केले, मात्र ते बेकायदेशीर केले आणि विशेष म्हणजे चक्क नवी मुंबई महापालिकेच्या माहिती फलकाला पूर्णतः झाकून केल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.




विशेष आश्चर्य म्हणजे सदर बेकायदा जाहिरात लावून चार दिवस उलटून गेले मात्र रविवारपर्यंत ही जाहिरात जैसे थे असल्याने सहाय्यक आयुक्त तथा नेरूळ वॉर्ड अधिकारी आणि अतिक्रमण विभागाचे याकडे लक्ष कसे नाही, असा सवाल विचारला जात आहे. नवी मुंबई महापालिकेच्या वतीने संपूर्ण शहरात माहिती फलक आणि दिशादर्शक फलक नागरिकांच्या माहितीसाठी लावण्यात आले आहेत. या माहितीच्या आधारे शहराबाहेरील नागरिकांना अचूक माहिती मिळते. माहिती फलकावर कोणती गृहनिर्माण सोसायटी कोणत्या दिशेला आहे याची माहिती नागरिकांना समजत असते. सध्या उन्हाळ्याची सुट्टी असून राज्यातून आणि देशातून नागरिक नवी मुंबईत आपल्या नातेवाईकांच्या घरी येतात. अशावेळी अचूक स्थळी जाण्यासाठी माहिती फलकाचा उपयोग नागरिकांना होत असतो, मात्र नेरूळ सेक्टर ८ येथील मुख्य चौकात असलेल्या माहिती फलकावर चक्क नवी मुंबई काँग्रेस कमिटीने आक्रमण केले असल्याचे पाहावयास मिळते. स्व. राजीव गांधी यांना कोटी कोटी प्रणाम करण्यासाठी नवी मुंबई काँग्रेस कमिटीने चक्क माहिती फलक लपवला असून ही बेकायदा जाहिरात रविवार उलटूनही जैसे थे आहे.

# नवी मुंबईत १० टक्के पाणीकपात

## आजपासून दोन दिवस संध्याकाळचा पुरवठा बंद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील पाणीसाठ्यात घट होत असून वाढते तापमान, पाण्याचे बाष्पीभवन आणि कमी पावसाच्या अंदाजामुळे नवी मुंबई महापालिकेने शहरात पाणीकपातीचा मोठा निर्णय घेतला आहे. सोमवार २५ मेपासून संपूर्ण नवी मुंबई महापालिका क्षेत्रात १० टक्के पाणीकपात लागू करण्यात येत आहे. पाणीबचतीचे नियोजन म्हणून शहरातील वेगवेगळ्या विभागांमध्ये आठवड्यातून दोन दिवस संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

धरणाची एकूण साठवण क्षमता १९०.८९० दशलक्ष घनमीटर असून, सध्या प्रत्यक्षात ३६.४७० दशलक्ष घनमीटर म्हणजे केवळ १९.११ टक्के उपयुक्त साठा शिल्लक आहे. हा पाणीसाठा पुढील वर्षाच्या नियोजनासाठी जपून वापरणे आवश्यक असल्याने ही कपात लागू करण्यात आली आहे. महापालिकेच्या या निर्णयाचा फटका केवळ महापालिका क्षेत्रालाच नाही, तर मोरबे धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या सिडको नोडमधील खारघर आणि कामोठे या भागांनाही बसणार असून या दोन्ही सिडको क्षेत्रांमध्ये दर शुक्रवारी पाणीपुरवठा पूर्ण बंद राहणार आहे. या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करावा व नवी मुंबई महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जलाशयांतील पाणीसाठा अधिकाधिक काळासाठी उपयोगात यावा या दृष्टीने खबरदारीचा उपाय तसेच भारतीय हवामान मान्सून विभागाने यंदा अल निनो आणि ‘आयओडी’ परिस्थितीबाबत व्यक्त केलेला अंदाज या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार ही उपाययोजना करण्यात येत आहे.

**पाणी बंदचे वेळापत्रक**

बेलापूर – सोमवार व गुरुवार
नेरूळ – मंगळवार व शनिवार
तुर्भे – बुधवार व रविवार
वाशी – गुरुवार व सोमवार
कोपरखैरणे – मंगळवार व शनिवार
घणसोली – बुधवार व रविवार
ऐरोली – शुक्रवार
दिघा – म.औ.वि.मं. च्या शटडाऊन संभाव्य वेळापत्रकाप्रमाणे.



### ठाण्यातही कपात

मुंबई पालिकेने १५ मेपासून १० टक्के पाणी कपात लागू केली. मुंबई पालिकेकडून ठाणे पालिका हद्दीत पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या भागांतील पुरवठ्यावर परिणाम होणार आहे. नौपाडा–कोपरी प्रभागमधील हाजुरी, लुईसवाडी, नामदेववाडी, गावदेवी जलकुंभ, टेंभी बंगला जलकुंभ, कोपरी धोबीघाट, कन्हैयानगर जलकुंभ, कोपरी, नौपाडा, पाचपाखाडी; लोकमान्य–सावरकरनगर समितीमधील साईनाथनगर, शिवाजीनगर, अंबिकानगर; माजीवाडा–मानपाडामधील बाळकुम पाडा, आंबेडकरनगर, गांधीनगर परिसरात १० टक्के कपात लागू राहणार आहे.

# सिडकोतील १२९ कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त रक्तदान

**नवी मुंबई : बातमीदार**

टाटा कॅन्सर उपचार रुग्णालय, खारघर येथे रक्ताचा संचय कमी असल्यामुळे तसेच देशभरातून येणाऱ्या कॅन्सर रुग्णांची संख्या वाढल्यामुळे रुग्णालयाने सिडको महामंडळाला रक्तदान शिबिर आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार रविवारी (दि. २४) सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सिडकोतील बहुसंख्य कर्मचाऱ्यांनी या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला व रक्तदान केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या हस्ते झाले. सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष सुभाष पाटील, सरचिटणीस नितीन कांबळे, उपाध्यक्ष सुधीर कोळी, सिडकोचे कार्मिक अधिकारी संतोष पळशीकर, सहसचिव सुबोध भोईर, धर्मराज भगत, अमोल दळवी, प्रमिला पाटील, प्राची सावंत व रुग्णालयातर्फे कविता ससाणे तसेच इतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

टाटा कॅन्सर हॉस्पिटलने देशभरातून कॅन्सर उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना रक्तपेढीमध्ये रक्त कमी उपलब्ध असल्याने सिडको कर्मचाऱ्यांना रक्तदानाचे आवाहन केले होते. त्यानुसार सामाजिक भान असलेल्या सिडकोतील १२९ कर्मचाऱ्यांनी रक्तदान शिबिरात सहभाग घेतला. महिला अभियंता कुमारी किरण राजूरकर यांनी ११८व्या वेळी रक्तदान केले.

# वाशीत धावत्या ट्रॅव्हल्स बसला आग; प्रवासी सुरक्षित

**नवी मुंबई : वार्ताहर**

नवी मुंबईतील वाशी हायवे ब्रिजवर रविवारी (दि. २४) एक धक्कादायक घटना घडली. पुण्याहून गुजरातमधील राजकोटच्या दिशेने प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या मनीष ट्रॅव्हल्स या खासगी ट्रॅव्हल्स बसला अचानक भीषण आग लागली. आगीचे वृत्त समजताच महामार्गावर काही काळ घबराटीचे वातावरण पसरले होते, मात्र अग्निशमन दलाने तत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेतली आणि आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. चालकाच्या प्रसंगावधानामुळे प्रवाशांचे प्राण वाचले.



प्राथमिक माहितीनुसार ही खासगी लक्झरी बस वाशी हायवे ब्रिजवरून जात असताना अचानक बसच्या इंजिनमधून धूर निघत असल्याचे चालकाच्या निदर्शनास आले. चालकाने क्षणाचाही विलंब न लावता बस रस्त्याच्या कडेला थांबवली आणि बसमधील सर्व प्रवाशांना त्वरित खाली उतरण्याचे आवाहन केले. प्रवासी खाली उतरत असतानाच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली असून सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि वाशी अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक परिश्रमानंतर बसला लागलेली आग आटोक्यात आणली. या आगीत बसचे प्रचंड नुकसान झाले असून बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे. या भीषण आगीमुळे वाशी हायवेवरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती आणि रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आगीवर नियंत्रण मिळवल्यानंतर हायवेवरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

बसला आग नेमकी कशामुळे लागली याचे अचूक कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. गरमीमुळे किंवा शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

# खाद्यतेलाच्या नावाखाली डिझेलची तस्करी

## ४१ लाखांचा मुद्देमाल जप्त | कळंबोलीच्या मालकासह दोघांवर गुन्हा


**नवी मुंबई : प्रतिनिधी**


मुंबई–नाशिक महामार्गावर खारेगाव आणि कसारा परिसरात प्रशासनाने बेकायदेशीर इंधन वाहतुकीविरोधात जोरदार मोहीम हाती घेतली आहे. कसारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी धाडसी कारवाई करत ‘एडिबल ऑइल’ म्हणजेच खाद्यतेलाच्या नावाखाली बेकायदेशीरपणे डिझेलची वाहतूक करणारा टँकर जप्त केला. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ४१ लाख २६ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून टँकरचालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अपर पोलीस अधीक्षक (ठाणे ग्रामीण) यांच्या आदेशानुसार मुंबई–नाशिक महामार्गावरील चिंतामणवाडी पोलीस चौकीसमोर नाकाबंदी सुरू होती. त्यावेळी नाशिकच्या दिशेने टँकरमधून अवैध पेट्रोलियम इंधनाची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती शहापूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यामार्फत कसारा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुरेश गावीत यांना मिळाली. याआधारे पोलीस पथकाने पहाटे ३:४० वाजण्याच्या सुमारास मुंबई बाजूकडून येणारा संशयास्पद टँकर (क्रमांक MH–४६–BU–२३८८) बॅरिकेडिंग करून थांबवला. टँकरचालक आसिफ सय्यद (रा. पिंप्री, जि. सोलापूर) याच्याकडे चौकशी केली असता टँकरमध्ये डिझेल असल्याचे त्याने कबूल केले. हे डिझेल त्याने टँकरमालक श्यामसुंदर दहिफळे (रा. कळंबोली, पनवेल) याच्याकडून गडचिरोली येथील सुरजागड लोहखाणीत विक्रीसाठी नेण्याकरिता ताब्यात घेतले होते.

कोणत्याही परवानग्या नसल्याने ही वाहतूक अवैध असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर शहापूर महसूल कार्यालयाच्या पुरवठा लिपिक नम्रता वरकुटे आणि पंचांच्या समक्ष टँकरची तपासणी करण्यात आली. टँकरच्या कप्प्यांमध्ये ९०.५६ रुपये प्रतिलिटर दराचे एकूण २९,००० लिटर बेकायदेशीर डिझेल आढळले. पोलिसांनी २६ लाख २६ हजार २४० रुपये किमतीचे डिझेल व १५ लाख रुपये किमतीचा टँकर असा एकूण ४१ लाख २६ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कोणतेही वैध मापदंड किंवा कराननामा न करता थेट पेट्रोल पंपावरून डिझेल भरून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने ही धोकादायक वाहतूक केली जात होती. या प्रकरणी पोलीस हवालदार सुनील दत्तात्रेय थाळेकर यांच्या फिर्यादीवरून चालक आसिफ सय्यद आणि टँकरमालक श्यामसुंदर दहिफळे यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता २०२३ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियमाच्या विविध कलमान्वये कसारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# समुद्र किनाऱ्यावर उभे असलेले किल्ले सागरी इतिहासाचे साक्षीदार





उरणच्या किनाऱ्यावर उभे असलेले किल्ले म्हणजे इथल्या सागरी इतिहासाची पानेच आहेत. उरणचा किल्ला, खांदेरी किल्ला आणि उंदेरी किल्ला हे तीनही किल्ले अरबी समुद्राचे पहारेकरी आहेत. उरणचा किल्ला उरण गावातच समुद्रकिनारी आहे. हा किल्ला पोर्तुगीजांनी १६व्या शतकात बांधला. नंतर मराठ्यांनी, इंग्रजांनी यावर सत्ता गाजवली. आज किल्ल्याची तटबंदी, बुरुज भग्नावस्थेत आहेत, पण तरी त्याचा रुबाब कायम आहे. किल्ल्यात शिरलं की समुद्राची खारी हवा अंगावर येते. तटावरून उभं राहिलं की समोर पसरलेला अथांग समुद्र, लांबवर दिसणारी गेट वे ऑफ इंडियाची रेषा आणि बंदरात येणारी–जाणारी जहाजे दिसतात.

संध्याकाळी ५ वाजेनंतर इथे स्थानिकांची गर्दी होते. ज्येष्ठ नागरिक कट्ट्यावर बसून गप्पा मारतात. "आम्ही लहान होतो तेव्हा किल्ल्यावर लग्न लागत" अशा आठवणी निघतात. लहान मुलं लपाछपी खेळतात. प्रेमीयुगुलं समुद्राकडे बघत बसतात. किल्ला म्हणजे उरणकरांचं हक्काचं विरंगुळ्याचं ठिकाण आहे.

खांदेरी किल्ला हा समुद्रात आहे. उरणच्या किनाऱ्यापासून ३ किमी आत. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७९ साली हा जलदुर्ग बांधला. इंग्रज आणि सिद्दीच्या आरमारावर नजर ठेवण्यासाठी याची निर्मिती झाली. किल्ल्यावर दीपगृह आहे. बोटीने जावे लागते. किल्ल्यावरून मुंबईचा किनारा, गेटवे, अलिबागपर्यंतचा प्रदेश दिसतो. इतिहासप्रेमी आणि ट्रेकर्ससाठी ही पर्वणीच ठरते.

उंदेरी किल्ला खांदेरीपासून हाकेच्या अंतरावर आहे. याला 'जैतापूरचा किल्ला'ही म्हणतात. सिद्दीने हा किल्ला बांधला. खांदेरी–उंदेरी दोन किल्ल्यांमध्ये अनेक लढाया झाल्या. मराठ्यांचे व सिद्दीचे आरमार यांच्यात इथे घनघोर युद्ध झाल्याच्या नोंदी आहेत. हे तीनही किल्ले उरणच्या सागरी पराक्रमाचे साक्षीदार आहेत. शाळेच्या सहली इथे येतात. इतिहासाच्या पुस्तकात वाचलेल्या गोष्टी प्रत्यक्ष बघायला मिळतात. किल्ल्याच्या दगडांना हात लावला की इतिहासाला स्पर्श केल्यासारखे वाटते. आज हे किल्ले पर्यटनस्थळ झालेत, पण त्यांचे ऐतिहासिक महत्त्व आबाधित आहे. ते आपल्या पूर्वजांच्या शौर्याची, सागरी सामर्थ्याची आठवण करून देतात.

(साभार : इंटरनेट)

# संकल्प चॅरिटेबल ट्रस्टतर्फे विद्यार्थी, नागरिकांचा सत्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

संकल्प चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शनिवारी (दि. २३) वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी तसेच विशेष प्रावीण्य मिळविलेल्या नागरिकांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नेरूळ गावातील विशेष प्रावीण्य मिळविलेल्या नागरिकांत रामदास पाटील, मनोज ठाकूर, साहिल घरत, डॉ. निलांगी भोपी, डॉ. सिद्धेश म्हात्रे, डॉ. मानसी म्हात्रे, रवींद्र मढवी, कुंदन भोईर, प्राजक्ता म्हात्रे, सुहास पाटील, वैभव जाधव यांचा तसेच इयत्ता १०वी, १२वी, पदवीधर अनेक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी खासदार संजीव नाईक, नवी मुंबई महापौर सुजाता पाटील, नगरसेविका रुपाली भगत, मा. उपमहापौर अशोक गावडे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. निरंत पाटील, संदीप पाटील, मिलिंद पाटील व ॲड. संकल्प पाटील तसेच निमंत्रक नगरसेविका प्रीती भोपी, क्रीडा समिती सभापती गिरीश म्हात्रे, समाजसेवक अक्षय पाटील व शेखर भोपी होते.

# दिवाळे स्मशानभूमीत सोयीसुविधा पुरवाव्यात; ग्रामस्थांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळे कोळीवाडा परिसरातील स्मशानभूमीच्या विकासकामाला गेल्या वर्षभरापासून सुरुवात झाली असली तरी हे काम अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. परिणामी अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची कोणतीही पर्यायी व्यवस्था नसल्याने ग्रामस्थांना तासन्‌तास उन्हात उभे राहावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



दरम्यान, पालिका प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन रखडलेले काम वेगाने पूर्ण करावे, तसेच नागरिकांसाठी तात्पुरती बसण्याची व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी दिवाळे ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार जुनी आसनव्यवस्था आणि काही मूलभूत सुविधा हटवण्यात आल्या, मात्र त्याऐवजी कोणतीही तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली नाही.

# नवी मुंबईत पारंपरिक ‘आगोट’ची लगबग

**नवी मुंबई : बातमीदार**

मान्सून आता अगदी दारात येऊन ठेपला असून, नवी मुंबईत पावसाळ्यापूर्वीच्या पारंपरिक “आगोट”ची लगबग सुरू झाली आहे. आभाळात काळे ढग दाटू लागले आहेत. समुद्राच्या वाऱ्याला ओलसर गारवा लाभू लागला आहे आणि गावगावठाणांत पावसाळ्याची चाहूल स्पष्ट जाणवत आहे. त्यामुळे नवी मुंबईतील कोळीवाडे, बाजारपेठा आणि घराघरांत पावसाळ्याच्या स्वागताची तयारी जोर धरू लागली आहे.




नवी मुंबईतील बाजारपेठांमध्ये सध्या कडधान्यांच्या पोत्यांच्या राशी दिसून येत आहेत. मसाल्यांचा खमंग दरवळ, घरगुती लोणच्यांचा सुगंध आणि सुकी मासळीच्या खरेदीला आलेला जोर यामुळे आगोटच्या खरेदीला चांगलेच उधाण आले आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने ताज्या माशांची आवक कमी होते. त्यामुळे बोंबील, सुकी कोळंबी, जवळा आणि सुकट यांसारख्या सुक्या मासळीचा साठा करण्याकडे कोळी बांधवांसह नागरिकांचा कल वाढला आहे.

यावेळी दिवाळे कोळीवाडा, सारसोळे, करावे, वाशी आणि घणसोली परिसरातील बाजारांत पहाटेपासूनच ग्राहकांची गर्दी पाहायला मिळत आहे. महिलावर्ग मसाले दळणे, पापड–कुरडया तयार करणे तसेच लोणची मुरवण्याच्या कामात व्यस्त असून, घराघरांत पावसाळ्याच्या तयारीचा उत्साह दिसून येत आहे. दुसरीकडे कोळीवाड्यांमध्ये सुकी मासळी वाळवण्याची आणि साठवण्याची धावपळ सुरू आहे. खाऱ्या वाऱ्यासोबत दरवळणारा बोंबील आणि कोळंबीचा सुगंध परिसराला पारंपरिक आगोटची झलक देत आहे.

दरम्यान, हवामान खात्याने लवकरच मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तविल्याने नागरिकांकडून छत्र्या, रेनकोट, धान्यसाठा आणि घरगुती साहित्य खरेदीलाही वेग आला आहे. शहराच्या आधुनिक धावपळीतही नवी मुंबईत आगोटीची पारंपरिक संस्कृती आजही जपली जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

“नवी मुंबईकरांसाठी आगोट म्हणजे केवळ तयारीच नाही, तर आठवणी, परंपरा आणि पावसाळ्याच्या स्वागताचा एक मोठा भावनिक उत्सव असतो,” असे सुनीता नीलकंठ गझणे यांनी यावेळी सांगितले.

# श्रीवर्धनमध्ये वीजपुरवठा वारंवार होतोय खंडित; नागरिकांसह पर्यटक त्रस्त



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरांमध्ये पर्यटक शनिवारी व रविवारी मोठ्या प्रमाणामध्ये येत असतात. पण मागील काही महिन्यांपासून श्रीवर्धन पर्यटकांनी भरून गेल्यानंतर शहरामध्ये वीज पुरवठा कायम कमी जास्त दाबाने होत असतो. तर शहरातील अनेक भागांमध्ये अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होण्याचा प्रकार देखील घडत असतो. एका ट्रान्सफॉर्मरवर पूर्वी २५ ते ३० एसी होते. अशा प्रत्येक ट्रान्सफॉर्मर वरती आता दीडशेपेक्षा जास्त एसी चालू होत असल्यामुळे वीज पुरवठा कमी व जास्त दाबाने होत असल्याचे पाहायला मिळते.

महावितरणचे अधिकारी कोणीही नवीन कनेक्शन घेण्यासाठी गेल्यास एक प्रतिज्ञापत्र घेऊन त्याला नवीन वीज कनेक्शन देत असतात. परंतु नवीन वीज कनेक्शन देताना सदर भागामध्ये वीज पुरवठा किती प्रमाणात केला जातो व त्याची क्षमता किती आहे. हे पाहूनच नवीन कनेक्शन देणे गरजेचे आहे.

केवळ महावितरणला डिपॉझिटचे पैसे मिळतात व नवीन कनेक्शन सुरू झाल्यावर वीज बिलाचे पैसे मिळतात. यासाठी नवीन कनेक्शन देण्याचे उद्योग महावितरणचे अधिकारी करत असतात. परंतु याचा त्रास सामान्य नागरिकांना होत असतो. श्रीवर्धन शहरात लॉज, हॉटेल्स व होमस्टे याची संख्या दिवसेंदिवस वाढत असून अनेक जण आपल्या असलेल्या जागेमध्ये नवीन रूम्स बांधून त्यामध्ये वातानुकूलित यंत्रणा बसवण्याचे प्रकार सुरू आहेत. मात्र हे सर्व प्रकार सुरू असताना महावितरणने ट्रान्सफॉर्मरच्या संख्येमध्ये वाढ करणे गरजेचे आहे. काल शनिवार असल्यामुळे श्रीवर्धन शहरात पर्यटक खूप मोठ्या प्रमाणात आले होते. परंतु सायंकाळपासूनच वीज पुरवठा सातत्याने कमी जास्त दाबाने होत होता.

त्यातच रात्री साडेनऊ नंतर वारंवार वीज पुरवठा खंडित होत होता.वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार सकाळ पर्यंत सुरु होता. यामुळे ज्या हॉटेल मालकांकडे पर्यटक थांबले होते अशा हॉटेल मालकांना पर्यटकांच्या अक्षरशः शिव्या खाव्या लागत होत्या. अनेक हॉटेल्स मध्ये इन्व्हर्टर बॅकअप असला तरीही वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्यानंतर इन्व्हर्टर देखील बंद पडतात. सातत्याने वीज पुरवठा कमी जास्त दाबाने होत असल्यामुळे श्रीवर्धन शहरातील गणेशाळी येथील महादेव कॉम्प्लेक्स मध्ये एका फ्लॅट मधील इन्व्हर्टरला आग लागण्याचा प्रकार देखील घडला आहे. तरी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी वीज पुरवठा योग्य दाबाने होईल व सुरळीत सुरू राहील. याबाबत प्रयत्न करावेत अशी मागणी नागरिकानी केली.

# खोपोलीत हरवलेले ४० मोबाईल पोलिसांकडून मूळ मालकांना सुपूर्द

**खोपोली, खालापूर, चौक : प्रतिनिधी**

कधी गर्दीत, कधी प्रवासात, तर कधी नकळत हरवलेला मोबाईल परत मिळेल अशी आशाच अनेकजण सोडून देतात. मात्र खोपोली पोलिसांनी आपल्या तत्परतेने आणि

तांत्रिक कौशल्याच्या जोरावर ४० नागरिकांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलवला.खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध नागरिकांनी गहाळ झालेल्या मोबाईल फोनबाबत तक्रारी नोंदवल्या होत्या. तक्रारींचा तपास करत पोलिसांनी 'CEIR' (सेंट्रलइक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर) या आधुनिक प्रणालीचा प्वापर केला. त्यातून तब्बल ८ लाख २४ हजार रुपये किंमतीचे ४० मोबाईल फोन शोधण्यात पोलिसांना यश आले. वापरात विशेष म्हणजे हे मोबाईल केवळ रायगड जिल्ह्यातच नव्हे, तर महाराष्ट्रातील विविध भागांसह इतर राज्यांमध्ये असल्याचे निष्पन्न झाले. तांत्रिक तपास, माहिती संकलन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे मोबाईल शोधून काढण्यात आले. खोपोली पोलीस ठाण्यातील कार्यक्रमात हे मोबाईल मूळ मालकांकडे सुपूर्द करण्यातआले. हरवलेली मौल्यवान वस्तू मिळाल्याने अनेकनागरिकांनी आनंद व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले.

विशेष बाब म्हणजे, यापूर्वीही खोपोली पोलिसांनी १२२ गहाळ मोबाईल हस्तगत केले असून, आतापर्यंत एकूण १६२ मोबाईल फोन, सुमारे ४० लाख ३१ हजार रुपये ३०० किमतीचे, शोधून मूळ मालकांकडे सुपूर्द करण्यात आले.ही उल्लेखनीय कामगिरी रायगड उपविभागीय पोलीसअधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली,खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वात तांत्रिक कौशल्याच्या जोरावर पार पाडली.



# १ जूनपासून मासेमारी बंद होणार असल्याने बोटी किनारी; आता रापणाचा आधार

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

यावर्षीचा मासेमारीचा हंगाम दुष्काळीच गेला. सतत वादळी पाऊस,हवामानात होणारे बदल आणि एलीडीच्या बोटींची अनधिकृत मासेमारी मुळे स्थानिक कोळी बांधवाना खोल समुद्रात जाऊन देखील मासे मिळत नसल्याने हात हलवत परतावे लागते .आता आला पावसाळा बोटीवरील खलाशी सुरवातीची काही दिवस बोटीतील जाळी काढून स्वच्छ करून बोटी पावसापासून सुरक्षित ठेवण्यात जातात.

राजपुरी येथील कोळीबांधवानी आपल्या बोटी पारंपरिक पध्दतीनीने किनारी ओढल्या. नंतर सुरु होतो उपजीविकेचा प्रश्न त्यावर उपाय म्हणून किनाऱ्यावर जाळी टाकून उसळत्या लाटांमध्ये आपला जीव धोक्यात टाकून किनारी मासे पकडून आपली उपजीविका चालवणे म्हणजे रापण मासेमारी ज्यांना रापण धोक्याचे वाटते ते मच्छिमार रोजावर बिगारी कामाला जाऊन आपले पोट भारतात ह्यात देखील रापण करताना जाळ्यात मासेकमी समुद्रातील कचरा ऑईल जास्त येत असल्याने कोळी बांधवांवर संकट आहे



रापण म्हणजे नक्की काय ? तर रापणीचे जाळे फारच मोठे असते. ते पाण्याचा मोठा भाग व्यापते. त्यामध्ये अडकलेलेच मासे मिळतात. त्या जाळ्याला दोन्ही बाजूंना पन्नास ते साठ वाव जाड काथ्याचा दोरखंड (टाकणी), पन्नास ते साठ पाटे (जाळ्यांचे तुकडे) जोडून, पंधरा फूट उंची राखली जाते. मधील घोळाच्या भागाला पाटे मजबूत लावले जातात. जाळ्याच्या सुरुवातीला व दोरखंडाच्या शेवटी पंधरा फूट उंचीचा मजबूत उंडलीचा (बांबू) दांडका लावलेला असतो. त्यामुळे जाळे पाण्यात उभे सरळ राहण्यास मदत होते .जाळ्याच्या वरील भागात तरंग व खाली जडत्व लावलेले असत. जाळे जड शिशामुळे तळाला जाऊन उभे राहते . मासे जाळ्याच्या बाहेर जाऊ शकत नाहीत. जाळ्याच्या तरंगाची पूर्ण माळ कमी पाण्यात दिसत असे.पुढे मार्ग काढत जाळे टाकले जाई. जाळे अर्धवर्तुळाकार पसरल्यानंतर किनाऱ्याकडे वळे. त्यावेळी उरलेले जाळे व शेवटी, दोरखंड टाकला जाई. एक माणूस दुसऱ्या दोरखंडाचे टोक घेऊन, उसळत्या लाटांमध्ये किनाऱ्यावर येतो.रापण ओढणे हे येरागबाळ्यांचे काम नव्हे. त्याला कंबर मजबूत व ताकद भक्कम लागते. दोरखंड माणसांकडून त्यांचे पाय मातीत/वाळूत खोलवर रोवून ओढला जाई. ती माणसे फार श्रमाचे काम उपाशी पोटी करत असत.

दोरखंडानंतर टांगूल येत असल्याने, जाळे किनारी आल्यावर जाळ्यात मासे मिळाले नाही तर पुन्हा हा कष्टच खेळ सुरु राहतो .मासे पूर्णतः किनाऱ्यावर घेतल्यानंतर ज्यांना मासे विकत घ्यायचे असतात ती मंडळी पुढे सरसावत; पैसे देऊन मासे खरेदी करत. शिल्लक राहिलेले मासे सर्वांमध्ये वाटले जात. अशा प्रकारे सकाळी ४ वाजता सुरु झालेले रापण दुपारी २ वाजेपर्यंत सुरु राहते .पावसाळी कोळीबांधवनच्या उपजीविकेसाठी लागणारे कष्टाचा अनुभव सामान्य माणसाला कधी समजणार शासन ह्याकडे काही पाहणार आधीच डिझेलवरील परतावा रद्द केल्याने महागडे डिझेल खरेदी करून मासेमारी परवडत नाही.

> **मुरुडमध्ये मच्छिमार बोटी ३०० आहेत परंतु त्यातील ५० बोटींना काम आहे, बाकीच्यांना खलाश्याचे पगार देणे होत नाही आता तर पावसाळा सुरु झाला. बोट किनारी आल्या. आता कोळी बांधव रोज सकाळी ४ वाजता उठून समुद्राच्या भरतीवेळी उसळल्या लाटांमध्ये मोठी लांब जाळी खांद्यावर घेऊन जातात एक जाळीला पकडण्यासाठी २० ते ३० तरुण बांधव लागतात. दुपारपर्यंत रापण करून जे मासे मिळतात ते विकून आपला वाटा घेऊन घरी यायचे असा दिनक्रम पुढील दोन महिने सुरु राहणार. जे शारीरिक कमकुवत आहे ते बांधव गवंडी कामात व पँटिंग कामात लागतात.**
>
> **–प्रकाश सरपाटील, मच्छीमार**

# पालीत नगरपंचायतीतर्फे मान्सूनपूर्व कामांना वेग

■ पावसाळ्याआधी कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न

**पाली : रामप्रहर वृत्त**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहरात नगरपंचायत तर्फे नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली आहे. पावसाळ्यापूर्वी गटारे आणि नाले सफाईची ही सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. परिणामी पालीत पावसाळ्यात गटारे व नाले तुंबण्याचा धोका राहणार नाही.

पाली नगरपंचायत कार्यालयात मान्सूनपूर्व कामांची तयारी व नियोजन बैठक नगराध्यक्ष पराग मेहता उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर तसेच सर्व नगरसेवक यांच्या उपस्थितीत पार पडली. त्यानुसार पाली शहरातील सर्व मुख्य नाले व अंतर्गत गटारे यांचे सफाई व दुरुस्ती काम युद्ध पातळीवर चालू आहे. अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वापरून चांगल्या पद्धतीने नालेसफाई करण्यात येत आहेठरलेल्या नियोजनाद्वारे येथील वेगवेगळ्या ठिकाणची नालेसफाई टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येईल. बांधकाम साहित्य यामध्ये वाळू व रेती, पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे येथील बहुसंख्य ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबली आहेत. ते सर्व काढून नालेसफाई होत आहे.



नगरपंचायतचे सफाई कर्मचारी नियमित नालेसफाई करतात. पावसाळ्यापूर्वी होत असलेली नालेसफाई ही अत्याधुनिक यंत्र व जेसीबीच्या साह्याने अधिकची माणसे घेऊन करण्यात येत आहे. याबरोबरच गटारे व नाल्याभोवती उगवलेले गवत, झाडे झुडपे देखील काढली जात आहेत. त्यामुळे या तुंबलेली गटारे व नाले पूर्णपणे साफ केली जात आहेत. तसेच नालेसफाई सुरुवात झाल्याने दुर्गंधी व घाण सर्व समस्या काही दिवसांत मार्गी लागणार आहेत.

> **पाली नगरपंचायत तर्फे मान्सूनपूर्व कामांचे योग्य नियोजन केले असून अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वापरून सर्व प्रभागातील कामे सुरू आहेत. पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण केली जातील. नागरिकांना आवाहन आहे की त्यांनी गटारे व नाल्यामध्ये घरातील कचरा, प्लास्टिक कचरा किंवा बांधकाम साहित्य टाकू नये.**
>
> **–सुलतान बेनसेकर, उपनगराध्यक्ष, पाली**

# कोंढे अंगणवाडीत गरोदर मातांची नाव नोंदणी अन् ओटीभरण सोहळा

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण भागातील गरोदर मातांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतली जावी, माता आणि बालमृत्यू दराला अटकाव व्हावा, तसेच सर्व शासकीय आरोग्य योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचावा या उद्देशाने महिला आणि बालविकास विभागाच्यावतीने एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या बागमांडले बिटमधील कोंढे तर्फे श्रीवर्धन येथील अंगणवाडी केंद्रामध्ये 'गरोदर माता नाव नोंदणी' आणि पारंपरिक पद्धतीने 'ओटी भरणी' सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या नाविन्यपूर्ण आणि कौटुंबिक वातावरणातील कार्यक्रमाला गावातील महिलांनी उत्स्फूर्त दाद दिली.

प्राथमिक आरोग्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात वेळेत नाव नोंदणी होणे अत्यंत महत्त्वाचे असते. याच गोष्टीचे गांभीर्य ओळखून नव्याने गरोदर राहिलेल्या मातांची शासकीय दप्तरी अधिकृत नोंदणी या कार्यक्रमांतर्गत करण्यात आली. केवळ प्रशासकीय सोपस्कार न करता, या क्षणाचे औचित्य साधून भारतीय संस्कृती व परंपरेनुसार उपस्थित गरोदर मातांची खणानारळाने आणि साडी देऊन 'ओटी भरणी' करण्यात आली.



सोहळा यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका रजनी राजेश कासरुंग आणि मदतनीस यांनी विशेष पुढाकार घेतला. या कौटुंबिक सोहळ्यामुळे मातांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला. अंगणवाडी केंद्राची सजावट रंगीबेरंगी फुले आणि आकर्षक रांगोळीने केल्यामुळे संपूर्ण परिसरात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.नाव नोंदणी सोहळ्यानंतर उपस्थित महिलांना गरोदरपणात घ्यावयाची काळजी, घ्यायच्या लसी आणि अंगणवाडीमार्फत मिळणाऱ्या विविध सोयी-सुविधांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

माता व बालमृत्यू दर कमी करण्यासाठी आणि बाळंतपण सुरक्षित होण्यासाठी पहिल्या तिमाहीतच नाव नोंदणी करणे किती आवश्यक आहे, हे अंगणवाडी सेविका रजनी कासरुंग यांनी पालकांना पटवून दिले. गरोदरपणात शरीराला आवश्यक असणारा लोहयुक्त आहार, कॅल्शियमच्या गोळ्यांचे वेळेवर सेवन आणि रोजच्या जेवणात हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये व फळे समाविष्ट करण्याबाबत उपस्थित आरोग्य सेवकांनी सविस्तर धडे दिले. शासकीय रुग्णालयात किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात वेळेवर केल्या जाणाऱ्या तपासण्या आणि लसीकरण याविषयी मातांचे प्रबोधन करण्यात आले.

या आगळ्यावेगळ्या सोहळ्याला स्थानिक आरोग्य विभागाचे प्रतिनिधी, गरोदर मातांचे कुटुंबीय आणि गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या."अशा प्रकारच्या कौटुंबिक आणि आरोग्याभिमुख उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होते. अंगणवाडी केवळ मुलांसाठीच नाही, तर संपूर्ण गावाच्या आरोग्यासाठी दीपस्तंभ ठरत आहे. शासकीय योजनांची माहिती थेट तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे," असे मत उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केले.

# खोपोली आठवडी बाजारात तीन लाखांचा ऐवज लंपास

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील गुरुवार बाजारात रसायनी येथील दोन महिला खरेदीसाठी आले असता खरेदीच्या नादात त्यांच्या पर्समध्ये ठेवलेले २ लाख ८० हजाराचे दागिने अज्ञात महिला चोराने लंपास केल्याची घटना घडली असून बाजारात खरेदी करणे या दोन महिलांना (मामी व भाची) यांना महागात पडले.

तालुक्यातील रसायनी येथे राहणाऱ्या दोन महिला मामी व तिची भाची लोणावळा येथे साखरपुड्यासाठी गेल्या असता साखरपुडा संपल्यानंतर परतत असताना खोपोलीला उतरल्या व गुरुवार असल्याने खोपोलीत बाजार भरला होता त्या बाजारात काहीतरी खरेदी करून घरी जाऊ या हेतूने त्या दोघी मामी व भाची या गुरुवार बाजारात सायं ४:१५ च्या दरम्यान फिरत असताना बाजारपेठेतील हनुमान मंदिराच्या जवळ त्या एका भांड्याच्या दुकानाजवळ खरेदी करत असताना अज्ञात चोरांनी त्यांच्या पर्समधून दोघींचेही दागिने ठेवलेली पिशवी चोरी केल्याचा भास झाला. महीलांनी पर्स तपासली असता पर्समधून दागिने लंपास झाल्याचे लक्षात येताच खोपोली पोलिसांत तक्रार दाखल केली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पंजाबचा लखनऊवर दमदार विजय

## श्रेयस अय्यरचे नाबाद शतक



**लखनऊ : वृत्तसंस्था**

श्रेयस अय्यरची नाबाद शतकी खेळी आणि प्रभसिमरनच्या धमाकेदार अर्धशतकाच्या जोरावर पंजाब किंग्सच्या संघाने घरच्या मैदानावर खेळणाऱ्या लखनऊ सुपर जाएंट्सला पराभूत करत प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. पहिल्यांदा फलंदाजी करताना लखनऊ संघाने जॉश इंग्लिस आणि आयुष बडोनीच्या दमदार खेळीच्या जोरावर निर्धारित २० षटकात १९६ धावा केल्या. या धावांचा पाठलाग पंजाब किंग्सने सात विकेट्सने विजय नोंदवला.

पहिल्यांदा फलंदाजी करताना अर्शिन कुलकर्णीच्या रूपात लखनऊच्या संघाला पहिला धक्का बसला. तो खातेही न उघडता पहिल्या चेंडूवर बाद झाला. निकोलस पूरनही सात चेंडूचा सामना करून फक्त दोन धावा करून माघारी फिरला. पहिल्या दोन विकेट अगदी स्वस्तात गमावल्यावर जोस इंग्लिस याने ४४ चेंडूत नऊ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ७२ धावांची धमाकेदार खेळी केली. आयुष बडोनी याने १८ चेंडूत ४३ धावांच्या खेळीत पाच चौकार आणि तीन षटकार मारले. कर्णधार ऋषभ पंतने २२ चेंडूत तीन चौकाराच्या मदतीने २६ धावांची भर घातल्यावर अखेरच्या षटकात अब्दुल समदने २० चेंडूत तीन चौकार आणि तीन षटकाराच्या मदतीने लखनऊ सुपर जाएंट्सच्या धावफलकावर सहा बाद १९६ धावा लावल्या. लखनऊकडून पदार्पणाचा सामना खेळताना अर्जुन तेंडुलकर याने पाच चेंडूत नाबाद पाच धावांची खेळी केली.

लखनऊच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना मोहम्मद शमीने पहिल्या चेंडूवर प्रियांश आर्यला तंबूचा रस्ता दाखवला. कूपर कॉलॉनी यालाही शमीने १० चेंडूत १८ धावांवर चालते केले. संघ अडचणीत असताना श्रेयस अय्यर मैदानात आला. त्याने प्रभसिमरन सिंगसोबत तिसऱ्या विकेटसाठी ७६ चेंडूत १४० धावांची भागीदारी रचली. प्रभसिमरन ३९ चेंडूत सात चौकार आणि दोन षटकार मारून बाद झाल्यावर श्रेयसने सूर्यांश शेडगेच्या साथीने दोन षटके राखून संघाचा विजय निश्चित केला. श्रेयसने षटकारासह सामना संपवत आयपीएल कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले.

# गुरिंदरवीर भारताचा वेगवान धावपटू!

## शंभर मीटर शर्यतीत १०.०९ सेकंदाचा राष्ट्रीय विक्रम



**रांची : वृत्तसंस्था**

भारतीय ॲथलेटिक्स महासंघाच्या वरिष्ठ फेडरेशन चषक स्पर्धेत चोवीस तासाच्या आत तिसऱ्यांदा शंभर मीटर शर्यतीत राष्ट्रीय विक्रमाची नोंद झाली. अंतिम फेरीत गुरिंदरवीरने सनसनाटी शर्यतीत १०.९ सेकंदाचा नवा राष्ट्रीय विक्रम आपल्या नावावर केला. दुसरीकडे चारशे मीटर शर्यतीतही विशालने आपला राष्ट्रीय विक्रम सुधारताना ४५ सेकंदाच्या आत शर्यत पूर्ण करणारा पहिला भारतीय धावपटू ठरण्याचा मान मिळविला.

गुरिंदरवीरने प्रथम १०.१७ सेकंद वेळ देत अनिमेषचा राष्ट्रीय विक्रम मोडला. त्यानंतर दुसऱ्या उपांत्य फेरीत अनिमेषने १०.१४ सेकंद वेळ देताना पुन्हा राष्ट्रीय विक्रम आपल्या नावावर केला. अंतिम फेरीत दोघे एकमेकांसमोर आल्यावर गुरिंदरवीरने हंगामातील केवळ वैयक्तिकच नाही, तर आशियातील दुसरी सर्वोत्तम वेळ देत राष्ट्रीय विक्रम आपल्या नावावर केला. अनिमेष केवळ शतांश ११ सेकंदाने मागे राहिला. आशियातील ही दुसऱ्या क्रमांकाची सरस वेळ ठरली. याचवर्षी मे महिन्यात १०.०८ सेकंदांची वेळ नोंदवणारा जपानचा १९ वर्षीय फुकुतो कोमुरो पहिल्या क्रमांकावर आहे

या विक्रमी शर्यतीनंतर विशालने चारशे मीटर शर्यतीत ४४.९८ सेकंद वेळ देताना वैयक्तिक राष्ट्रीय विक्रम सुधारलाच नाही, तर हंगामातील आशियातील सर्वोत्तम वेळ दिली. राष्ट्रकुल स्पर्धा तोंडावर असताना आशियाई स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या तेजस्विन शंकरने ८०० मीटर शर्यतीत आठ हजार गुणांचा टप्पा पार केला. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय धावपटू ठरला. स्वत:चाच राष्ट्रीय विक्रम मोडत तेजस्विन आता आशियातील सर्वोत्तम धावपटूंत सातव्या क्रमांकावर पोहचला. तेजस्विनने ८०५७ गुण मिळविले.

# क्रिकेटर काजल साळुंखेची निवड

## महाराष्ट्र महिला संघाच्या चाचणी शिबिरात होणार सहभागी



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची गुणवान महिला क्रिकेटपटू काजल कैलास साळुंखे हिची निवड महाराष्ट्र महिला वरिष्ठ गटाच्या अंतिम संघ निवडण्यासाठीच्या शिबिरासाठी निवड करण्यात आली आहे. काजल ही महाडची रहिवासी असून एसबीसी क्रिकेट अकॅडमीमध्ये क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे.


रायगडच्या महिला संघासाठी खेळताना काजल हिने उत्तम खेळाचे प्रदर्शन केले असून तिने केलेल्या उत्तम कामगिरीच्या जोरावर तिची निवड एमसीएच्या निवड चाचणी शिबिरासाठी करण्यात आली आहे. काजलचे प्रशिक्षक आवेश चिचकर व अकॅडमीचे अध्यक्ष तथा आरडीसीएचे सहसचिव बशीर चिचकर यांनी काजलच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त केला आहे. तिने अकॅडमीमध्ये केलेली अथक मेहनत व परिश्रम फळाला आले असल्याचे त्यांनी सांगितले. याआधी एसबीसी क्रिकेट अकॅडमीची गुणवान खेळाडू रोशनी पारधी हिचीसुद्धा महाराष्ट्र महिला क्रिकेट असोसिएशनच्या १५, १९, २३ व वरिष्ठ गटाच्या संघात निवड करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह आरडीसीएचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी दोन्ही मुलींचे अभिनंदन केले आहे. दोन्ही गुणवान मुलींनी जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले असल्याने जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमी लोकांनीही आनंद व्यक्त केला आहे.

# श्रेयस अय्यरचे आयपीएलमधील पहिलेच शतक ठरले विक्रमी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यर याने लखनऊ सुपर जाएंट्सविरुद्धच्या 'करो वा मरो' अशा लढतीत नाबाद शतकी खेळीसह संघाला दिमाखदार विजय मिळवून दिला. ५१ चेंडूत नाबाद १०१ धावांच्या खेळीसह त्याने पंजाबच्या प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवल्या. एवढेच नाही तर आयपीएलमधील पहिल्या शतकासह त्याने खास नवा इतिहास रचला.



आयपीएलच्या आतापर्यंतच्या इतिहासात १६ कर्णधारांनी शतके झळकावली आहेत. यात सर्वांनी आघाडीच्या तीन क्रमांकावर फलंदाजी केली होती. लखनऊच्या एकाना स्टेडियमवर श्रेयस अय्यरने धावांचा पाठलाग करताना चौथ्या क्रमांकावर येऊन नाबाद शतकी खेळी साकारली. आयपीएलमध्ये चौथ्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाज करताना शतकी खेळी करणारा तो पहिला कर्णधार ठरला आहे.

आयपीएलच्या आतापर्यंतच्या इतिहासात धावांचा पाठलाग आयपीएलमध्ये फक्त तीन खेळाडूंनी कॅप्टन्सीत शतक झळकावे होते. यात संजू सॅमसन, विराट कोहली आणि वीरेंद्र सेहवाग यांचा समावेश होता. या यादीत आता श्रेयस अय्यरची वर्णी लागली आहे. विशेष म्हणजे धावांचा यशस्वी पाठलाग करताना शतकी खेळी करणारे चारही कर्णधार भारतीय आहेत. याआधी पंजाब किंग्सकडून लोकेश राहुल आणि अ‍ॅडम गिलख्रिस्ट यांनी शतके संघाचे नेतृत्व करताना शतके झळकावली होती, पण धावांचा पाठलाग करताना शतक ठोकणारा श्रेयस हा पंजाबचा पहिला कर्णधार ठरला आहे.

### सात हजार धावांचा पल्लाही गाठला

लखनऊविरुद्धच्या सामन्यात २५ धावा पूर्ण करताच श्रेयस अय्यरने टी-२० कारकिर्दीत सात हजार धावांचा पल्ला गाठला. शतकी खेळीसह त्याने २५४ डावातील २४७ डावात आतापर्यंत सात हजार ७६ धावा आपल्या खात्यात जमा केल्या आहेत. ३१ वर्षीय बॅटरची टी-२० कारकिर्दीतील हे चौथे शतक ठरले. आतापर्यंतच्या टी-२० कारकिर्दीत त्याने ५२व्या वेळी फिफ्टी प्लसचा आकडाही या सामन्यात पार केला. आयपीएलमधील त्याच्या कामगिरीबद्दल बोलायचे, तर आतापर्यंत त्याने १४७ सामन्यात ४२२९ धावा केल्या असून ३२ अर्धशतकासह एका शतकाचा समावेश आहे. लखनऊविरुद्धच्या नाबाद १०१ धावा ही त्याची आयपीएलमधील सर्वोच्च धावसंख्या आहे.

# क्रिकेटमधील रंगत वाढवण्यासाठी नवे नियम

**दुबई : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या सामन्यातील रंजकता वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) अनेकदा काही महत्त्वपूर्ण बदल केले जातात. आता कसोटी, वनडे आणि टी-२० सामन्यातील रंगत वाढवण्यासाठी आयसीसी एक भन्नाट कल्पना अंमलात आणण्याच्या तयारीत तयारीत आहे.

सामन्यातील रंगत वाढवण्यासाठी वेगवेगळ्या रंगाच्या चेंडूंचा वापर, मुख्य प्रशिक्षकावरील निर्बंध हटवणे आणि टी-२० क्रिकेटमध्ये डावांमधील ब्रेकचा वेळ कमी करण्याचा विचारही आयसीसी करत आहे. आयपीएलच्या फायनलआधी ३० मे रोजी अहमदाबाद येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या बैठकीनंतर क्रिकेटमध्ये नव्या नियमांवर शिक्कामोर्तब होईल, अशी माहिती समोर येत आहे.

क्रिकेटमध्ये प्रत्येक ब्रेक साधारण एक तास १० मिनिटांच्या अंतराने असतो. आता या काळात प्रशिक्षकाला मैदानात जाण्याची परवानगी मिळू शकते. सध्याच्या नियमानुसार जेव्हा एखादा खेळाडू ड्रिंक्स घेऊन मैदानात येतो, तेव्हा त्याला विशिष्ट प्रकारची जर्सी परिधान करावी लागते, मात्र प्रशिक्षकासाठीही हा नियम लागू असेल का? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. सध्याच्या घडीला टी-२० क्रिकेटमध्ये प्रशिक्षकाला मैदानात जाण्याची मुभा आहे.

आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सध्याच्या घडीला एका डावानंतर २० मिनिटांचा ब्रेक असतो. आता यात बदल करून ब्रेकचा अवधी १५ मिनिटांपर्यंत कमी केला जाऊ शकतो. त्यामुळे संघांना दुसऱ्या डावासाठी तयारी, चर्चा आणि रणनीती आखण्यासाठी पाच मिनिटे कमी मिळतील.

सर्वात मोठा आणि महत्त्वाचा प्रस्ताव म्हणजे पारंपरिक कसोटी सामन्यादरम्यान लाल चेंडूऐवजी पिंक बॉल वापरण्याची शक्यता आहे. हवामानातील अडथळे निर्माण झाल्यास दोन्ही संघांची सहमती असल्यास सामना फ्लडलाइट्सखाली पिंक बॉलने खेळवला जाऊ शकतो.

मैदानावरील पंचांना सामन्यादरम्यान गोलंदाजांच्या संशयास्पद शैलीची तपासणी करण्यासाठी हॉकआय डेटा वापरण्याची मुभा देण्याचाही प्रस्ताव आहे. ही प्रक्रिया नेमकी कशी राबवली जाईल हे अद्याप स्पष्ट नसले तरी संशयित गोलंदाजाला त्याच क्षणी रोखणे यामुळे शक्य होईल.

### हेड कोचला मैदानात एण्ट्री

*'क्रिकबझ'च्या एका रिपोर्टनुसार वनडे क्रिकेटमध्ये मुख्य प्रशिक्षकासंदर्भात नवे नियम लागू होऊ शकतात. सध्याच्या नियमानुसार ड्रिंक्स ब्रेकदरम्यान हेड कोचला मैदानात जाण्याची परवानगी नाही. फक्त सब्स्टिट्यूट खेळाडूंनाच मैदानात जाण्याची मुभा असते, मात्र यामध्ये बदल होऊ शकतो आणि रणनीती आखण्यासाठी प्रशिक्षकाला मैदानात प्रवेश दिला जाऊ शकतो.*

# अर्जुन, मला तुझा खूप अभिमान वाटतो...

## वडील सचिन तेंडुलकरची भावूक पोस्ट





**मुंबई : प्रतिनिधी**

अखेर अर्जुन तेंडुलकरला आयपीएल २०२६मध्ये खेळण्याची संधी मिळाली. लखनऊ सुपर जाएंट्सचा स्पर्धेतील अखेरचा सामना पंजाब किंग्सविरुद्ध खेळवला गेला. या सामन्यात पंजाब किंग्जने लखनऊवर सात विकेट्सने आणि दोन षटके राखून विजय मिळवला. संपूर्ण सीझन एका संधीची वाट पाहणाऱ्या अर्जुन तेंडुलकरला पंजाबविरुध्द स्पर्धेतील अखेरच्या सामन्यात खेळण्याची संधी मिळाली. या सामन्यानंतर आता वडील मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने लेकासाठी खास पोस्ट शेअर केली आहे.

अर्जुनने श्रेयस अय्यर व प्रभसिमरन सिंग यांची ७६ चेंडूत १४० धावांची भागीदारी तोडली. त्याने प्रभसिमरन सिंगला कमालीच्या यॉर्करवर पायचीत करत संघाला महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवून दिला. खरंतर अर्जुनच्या चेंडूवर २० धावांवर खेळतानाच प्रभसिमरन बाद होणार होता, पण ऋषभ पंतकडून विकेटच्या मागे झेल सुटला होता. मात्र अर्जुनने हार न मानता शानदार विकेट मिळवून दिली. त्याने या सामन्यात चार षटकांचा कोटा पूर्ण केला आणि एकूण ३६ धावा देत एक मोठी विकेट घेतली.

सचिन तेंडुलकरने आपल्या पोस्टमध्ये लेकाचे तोंडभरून कौतुक केले आहे. सचिनने अर्जुनचा फोटो पोस्ट करत लिहिले, "खूप छान खेळलास, अर्जुन संपूर्ण हंगाम तू स्वतःवर ठेवलेला विश्वास, शांतपणे केलेली मेहनत, संयम आणि शेवटच्या सामन्यापर्यंत संधीची वाट पाहूनही कायम सकारात्मक राहिलास याचा खूप अभिमान वाटतो. क्रिकेट फक्त कौशल्याची नाही, तर संयमाचीही परीक्षा पाहते आणि आज तू दोन्ही गोष्टी सुंदरपणे सिद्ध केल्या. नेहमीसारखेच पाय जमिनीवर ठेव आणि खेळावर असलेलं तुझं प्रेम कायम जप. खूप सारं प्रेम". सचिनच्या या पोस्टने लगेच सर्वांचे लक्ष्य वेधले आणि सर्वांनीच लाईक्स कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.

दरम्यान, सारा तेंडुलकरनेही लाडक्या भावासाठी पोस्ट करीत कौतुक केले आहे. अर्जुनसाठी तिने लिहिलं आहे की, "माझ्या लहान भावाला जगातलं सर्व काही मिळायला हवं, तो त्याचा पूर्ण हक्कदार आहे. तुझ्या मेहनतीचा, दबाव हाताळण्याच्या क्षमतेचा आणि या संपूर्ण प्रवासातील तुझ्या संयमाचा मला खूप अभिमान वाटतो."

### संधीचे सोने केले!

अर्जुन तेंडुलकरने संपूर्ण हंगाम संघासोबत घालवला, तो प्रत्येक सामन्यात डगआऊटमध्ये संघाची जर्सी घालून बसलेला दिसून आला, तर कधी खेळणाऱ्या खेळाडूंसाठी पाणी आणि मेसेज देण्यासाठी बाऊंड्री लाईनच्या शेजारी दिसे. मास्टर ब्लास्टर सचिनचा लेक असून खेळाप्रति त्याचे प्रेम, प्रामाणिक आणि साधेपणा चाहत्यांना चांगलाच भावला होता. त्याने संयमाने अखेरपर्यंत संधीची वाट पाहिली आणि संधी मिळाल्यानंतर तिचे अर्जुनने सोने केल्याचे बोलले जात आहे.

# टी-२० वर्ल्डकपसाठी भारतीय महिला संघ इंग्लंडला रवाना



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भाग घेण्यासाठी भारतीय महिला क्रिकेट संघ शनिवारी इंग्लंड आणि वेल्ससाठी रवाना झाला. ही बहुप्रतीक्षित विश्वचषक स्पर्धा १२ जून ते ५ जुलैदरम्यान खेळवली जाणार आहे.

अनुभवी खेळाडू हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा 'गट १'मध्ये समावेश करण्यात आला आहे. या गटात भारतासोबत ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, बांगलादेश आणि नेदरलँड संघांचा समावेश आहे. भारताची विश्वचषक मोहीम १४ जून रोजी बर्मिंगहॅम येथील एजबॅस्टन मैदानावर कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने सुरू होईल. यानंतर संघ लीडस् येथे नेदरलँडविरुद्ध आणि मँचेस्टर येथे दक्षिण आफ्रिका व बांगला देशविरुद्ध खेळेल. २८ जून रोजी लंडनमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचा शेवटचा साखळी सामना होईल.

विश्वचषकापूर्वी भारतीय संघ यजमान इंग्लंडविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. या मालिकेतील सामने अनुक्रमे २८ मे, ३० मे आणि २ जून रोजी होतील.

**संघ :** हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना, शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, भारती फुलमाळी, दीप्ती शर्मा, रिचा घोष, श्री चरणी, यास्तिका भाटिया, नंदनी शर्मा, अरुंधती रेड्डी, रेणुका सिंग, क्रांती गौड, श्रेयांका पाटील, राधा यादव.

**असे होतील भारताचे साखळी फेरीतील सामने**

(तारीख प्रतिस्पर्धी ठिकाण)

१४ जून पाकिस्तान बर्मिंगहम

१७ जून नेदरलँड लीडस्

२१ जून द. आफ्रिका मँचेस्टर

२५ जून बांगलादेश मँचेस्टर

२८ जून ऑस्ट्रेलिया लंडन

# धोनी 'सीएसके'चा पुढील हेड कोच?



**चेन्नई** : आयपीएल २०२६मध्ये चेन्नई सुपर किंग्जला आपल्या लैकिकास साजेसा खेळ करता आलेला नाही. संघाला प्ले ऑफ गाठण्यात अपयश आले असून त्यांना ग्रुप स्टेजमधूनच गाशा गुंडाळावा लागत आहे. यंदाच्या हंगामात चेन्नईचा थला अर्थात महेंद्रसिंह धोनी एकही सामना खेळला नाही. तो पोटरीच्या दुखापतीतून सावरलाच नाही. हा त्याचा शेवटचा हंगाम ठरतो की काय अशी चर्चा चाहत्यांमध्ये सुरू असतानाच रविचंद्रन अश्विनने सोशल मीडियावर एक बॉम्ब टाकला. त्याने धोनी आता चेन्नई सुपर किंग्जचा हेड कोच होणार असल्याचे संकेत दिले.

चेन्नईने यंदाच्या हंगामात १४ सामन्यांपैकी फक्त सहा सामने जिंकले आहेत. त्यामुळे आता हेड कोच स्टीफन फ्लेमिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. चाहतेदेखील चेन्नई आता नव्या कोचच्या शोधात असल्याचे बोलू लागले आहे. एका चाहत्याने गंमतीत अश्विनला ही जबाबदारी देऊ नये नाही, तर तो आपल्या युट्यूब चॅनलवर आधीच प्लेईंग ११ सांगून टाकेल, असे म्हटले. अश्विननेदेखील या गंमतीत केलेल्या वक्तव्यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्याने मी पूर्णपणे तुझ्याशी सहमत आहे मी प्लेईंग ११ नाही, तर विरोधी संघाला आमची फलंदाजी आणि गोलंदाजीची पूर्ण प्लॅनिंगदेखील सांगून टाकणार, असे म्हटले.तो पुढे म्हणाला की, जर एमएस धोनी आहे तर मग इतर कोणाचा शोध का घ्यावा.' अश्विनने असे वक्तव्य करताच सोशल मीडियावर भविष्यात धोनी हा चेन्नई सुपर किंग्जचा कोच होईल अशी चर्चा सुरू झाली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com